बँकेच्या मा॰ व्यवस्थापक समितीची सभा शनिवार दिनांक २९.४.२००० रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात बँकेचे अध्यक्ष माननीय श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली.
या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

-उपस्थित -

१. मा. श्री. सुनील केदार — अध्यक्ष
२. मा॰ सौ॰ आशाताई महाजन — उपाध्यक्षा
३. मा॰ श्री॰ अ॰ रा. गुप्ता — सदस्य
४. मा॰ श्री॰ सं॰ लि॰ चोरे — "
५. मा॰ श्री॰ वि॰ रा॰ हुलके — "
६. मा॰ श्री॰ ना॰ र॰ अग्निकाटे — "
७. मा॰ श्री॰ वि॰ वि॰ निमजे — "
८. मा॰ श्री॰ ब॰ भा॰ तायवाडे — "
९. मा॰ श्री॰ मु॰ भि॰ पन्नासे — "
१०. मा॰ श्री॰ चं॰ तु॰ समर्थ — "
११. मा॰ श्री॰ ए॰ एन॰ चौधरी — सरव्यवस्थापक
१२. मा॰ श्री॰ एस॰ एस॰ गोडे — प्र॰ व्यवस्थापक

-अनुपस्थित -

१. मा॰ श्री॰ र॰ व्यं॰ निमजे — सदस्य
२. मा॰ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
३. मा॰ विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक), नागपूर.
४. मा॰ विभागीय अधिकारी, महा. राज्य सह. बँक लिमि॰ विभागीय कार्यालय, नागपूर

---

सभेला सुरुवात करण्यापूर्वी अनुपस्थित असलेले संचालक माननीय श्री. र. व्यं. निमजे यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर सभेत उपस्थितांचे स्वागत करून विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस मा. अध्यक्ष यांनी सुरुवात केली.

विषय क्रमांक १ :— मागील दिनांक २५।३।२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :— मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक २५।३।२००० रोजी झालेल्या

29/4/2000



सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक २:- मागिल सभेत पारित झालेल्या ठरावानुसार कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागिल दिनांक २५।३।२००० चे सभेत पारित झालेल्या ठरावानुसार कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची मा० सरव्यवस्थापक यांनी थोडक्यात माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यात आली.

---

विषय क्रमांक ३:- बँकेच्या संकुलाचे भूमिपुजनाच्या कार्यक्रमासाठी झालेल्या खर्चाला मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ३:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. दिनांक १ एप्रिल २००० ला बँकेच्या संकुलाचे भूमिपूजन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, माननीय नामदार श्री विलासरावजी देशमुख यांचे हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाकरिता मंडप डेकोरेशन, गेट, पाण्याची व्यवस्था, निमंत्रण पत्रिका, बँकेचे माहिती पत्रक तयार करणे, फोटो, कार्यक्रमाची जाहिरात, सिक्युरिटी गार्ड, कार्यक्रम संचालन स्वागत गीत, बिछायत, कुलर्स, कोनशिला बसविणे, हार व गुच्छे इत्यादि आवश्यक कामाकरिता अपेक्षित मान्यतेवर खर्च करण्यात आला. याबाबतची बीले तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे. कार्यक्रमाच्या जाहिरातीचे खर्चाची बील प्राप्त न झाल्याने मंजूरीकरिता ठेवण्यात आली नाही.

| अ.क्र. | विवरण | खर्चाचा तपशिल | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १. | मे. गितांजली डेकोरेटर्स नागपूर | कोनशिला बसविणे व इतर सिव्हील वर्क. | ४१०६६.०० |
| २. | मे. ऐश्वर्या ग्राफीक्स नागपूर | बँकेचे माहितीचे पत्रक व बुकलेट | ४९९००.०० |
| ३. | मे. गुरुकृपा स्टेशनर्स ॲंड प्रिंटर्स, नागपूर | पत्रिका लिफाफे व कार पासेस | ४६०००.०० |
| ४. | मे. प्रफुल्ल नुतन डेकोरेशन नागपूर | बिछायत व कुलर्स इत्यादि | ४००३५.०० |
| ५. | मे. नशिब डेकोरेशन, नागपूर | मंडप, डेकोरेशन व ~~गेट फोटो~~ | ७०२००.०० |
| ६. | मे. अक्षर कॅब नागपूर | फोटो | ९०००.०० |
| ७. | मे. गंगा एक्वा पॅकर्स नागपूर | मिनरल पाणी व्यवस्था | ६५२५.०० |
| ८. | महानगर पालिका, नागपूर | २ टॅंकर पाणी | ८००.०० |

| | | |
|---|---|---|
| ९. मे० प्रभात पेंटींग, नागपूर | डेकोरेशन | १८१४.०० |
| १०. मे० दिनानाथ पडोळे, नागपूर | बॅचेस व थर्माकोल इत्यादि | ३७५०.०० |
| ११. मे० हटवार फुलमार्ट, नागपूर | हार व गुच्छे इत्यादि | ६७८५.०० |
| १२. मे० शिरिष फोटोग्राफर्स, नागपूर | फोटो | ५२८५.०० |
| १३. मे० पारळकर फोटोग्राफर्स, नागपूर | फोटो | ५७८०.०० |
| १४. श्री. कुळकर्णी | मंच संचालनाचे मानधन | २०००.०० |
| १५. श्री मोहिते | स्वागत गीत मानधन | १०००.०० |
| १६. मे० नोव्हेल सिक्युरिटी सर्व्हीस | सिक्युरिटी गार्ड | ५६०.०० |
| | एकूण रुपये | २९०५००.०० |

विषयावर सविस्तर चर्चा होउन दिनांक ११।४।२०००ला बॅंकेचे संकुलाचे भूमिपुजनाकरिता वरीलप्रमाणे झालेल्या एकूण रुपये २९०५००/- रक्कमेस मंजूरी देण्यांत येत आहे. प्राप्त न झालेली जाहिरातींची बिले मंजुरीकरिता पुढील सभेत ठेवण्यांत यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४ :- बॅंकेचे माहे मार्च २०००चे तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व बॅंकेचे माहे मार्च २०००चे तरला जींदगीच्या परिस्थितीची सभेला माहिती देतांना सांगितले की, बॅंकींग रेग्युलेशन ॲक्ट १८ प्रमाणे एकूण डिमांड ॲंड टाईम लायबीलिटीजच्या कमीत कमी ३% रोख निधी आणि कलम २४नुसार एकूण डिमांड ॲंड टाईम लायबीलिटीजच्या कमीत कमी २५% तरती राखावयाची आहे.

आज बॅंकेकडे तरती जींदगी ३३.८३ % आहे. व बॅंकेकडे १८.०० कोटी सरप्लस निधी आहे. हा सरप्लस निधी बॅंकेला अधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या सुरक्षित कर्जात गुंतवायला पाहिजे. यावर माननीय नायवाडे, संचालक म्हणाले की, सरप्लस निधी सरकारी प्रतिभूती मध्ये गुंतविण्यांत यावा.

Seen

विषयावर सविस्तर चर्चा होउन माहे मार्च २००० मध्ये बॅंकेने राखलेल्या रोख निधी व तरला जींदगीचे परिस्थितीची नोंद घेण्यांत आली, आणि बॅंकेकडे असलेल्या सरप्लस निधी अधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या सुरक्षित कर्जात/ठेवीत/योजनेत गुंतविण्यांत यावा व ही गुंतवणूक करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यांत आले, असे ठरले.

सूचक मा. श्री. वं. तु. समर्थ
अनुमोदक मा. श्री. गु. शि. पन्नासे.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५ :- बँकेचे हिंगणा शाखेतील मा. संचालक कक्ष व गेस्ट हाऊसच्या फर्निशिंगचे एस्टीमेटला मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ५ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या शाखा हिंगणा येथील बांधलेल्या स्वमालकीचे इमारतील मा. संचालक कक्ष व गेस्ट हाऊसची सोय उपलब्ध करून देण्यांत आली आहे. मा. संचालक कक्ष व गेस्ट रूमला फर्निशिंग करण्याकरिता आर्किटेक्ट श्री. चिंचमलातपूरे यांनी पी.व्ही.सी., पार्टीशन, टेबल तयार करणे, सोफा सेट, जुना टेबल दुरुस्त करणे, कांचा बसविणे, चटई लावणे इत्यादी कामाचे एस्टीमेट रुपये ६६७५२=००, आर्कीटेक्ट फी ४% प्रमाणे रुपये २६७०=०० व त्यावरील सर्व्हीस टॅक्स रु. १३३=०० असे एकूण रुपये ६९५५५ चे एस्टीमेट सादर केले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन हिंगणा शाखेचे इमारतीमधील मा. संचालक कक्ष व गेस्ट रूमचे फर्निशिंग करिता श्री. चिंचमलातपूरे यांनी एस्टीमेट रुपये ६९५५५ आर्कीटेक्ट फी व त्यावरील सर्व्हीस टॅक्सचा अंतर्भाव असलेले एस्टीमेट रुपये ६९५५५=०० ला मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६ :- बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आलेल्या सहकारी संस्थेचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ६ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, श्रीकृष्ण पत सहकारी संस्था मर्या., नागपूर, रजिस्टर नंबर ४७७/९४ यांचा अर्ज बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आलेला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे सभासदत्व मिळणेकरिता आलेल्या श्रीकृष्ण पत सहकारी संस्था मर्या., नागपूरचे मागील २-३ वर्षात संस्थेचे आर्थिक व्यवहारात वाढ नसल्याने संस्थेला सभासदत्व देण्यांत येवू नये असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७ :- मा. अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ८(१) :- बँकेत वकिलांचे पॅनेलवर नियुक्तीसाठी श्री वाय. एस. कोठावाळा यांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ८(१) :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सांगितले की, बँकेत वकिलांचे पॅनेलवर नियुक्ती मिळावी म्हणून श्री वाय.एस. कोठावाळा यांचा अर्ज आलेला आहे. त्यांनी शिक्षण, कामाचा अनुभव व सध्या कार्यरत असलेल्या संस्थांच्या माहिती याबाबतचा बायोडाटा अर्जासोबत दिला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा घेऊन श्री वाय.एस. कोठावाळा यांचे कामाचा अनुभव विचारात घेता त्यांना बँकेत वकिलांचे पॅनेल वर घेण्यात यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ८(२) :- कंप्युटरवर काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यास जादा मोबदला देण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८(२) :- मा. अध्यक्ष यांनी बँकेत ग्राहकांना तत्पर सेवा प्रदान करण्याचे दृष्टीने तसेच बँकेचे कामाचा वेग वाढावा यासाठी कंप्युटर बसवायचे असल्याने कंप्युटरवर काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यास जादा मोबदला द्यावा असे विचार असल्याचे सांगून कंप्युटरायझेशन झालेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील माहिती सभेस दिली व आपले बँकेत कंप्युटरवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास जादा मोबदला देण्याबाबत धोरण ठरवावे लागेल असे सांगितले.

बँकेतील अधिकारी/कर्मचारी यांना ऑन लाईन ट्रेनिंग देणे सुरू आहे असे मा. अध्यक्ष यांनी सांगितले असता ऑन लाईन - ट्रेनिंगमुळे एकाच टेबलची माहिती मिळेल, दुसऱ्या टेबलची काहीच माहिती मिळणार नाही असे मा. श्री. लाथवाडे, संचालक यांनी सांगितले व पुढे म्हणाले की, विद्यापीठाद्वारे कॉम्प्युटरवर अनेक प्रकारचे कोर्सेस शिकविल्या जातात. तसेच कंप्युटरचे प्रशिक्षण देणाऱ्या खाजगी संस्थामधून सुद्धा कोर्सेस उपलब्ध आहेत. बँकींग दृष्टिकोनातून फायद्याचे असलेले ६ महिने/१ वर्ष मुदतीचे कंप्युटर कोर्सेसची निवड करून व याकरिता लागणारी फी रिंबर्स करून बँकेतील अधिकारी कर्मचारी यांना प्रशिक्षित करावे. कॉम्प्युटरचे प्रशिक्षणामुळे कर्मचारी अधिकाऱ्यांची कार्यक्षमता वाढेल. तेव्हा बँकेतील सर्वच कर्मचारी अधिकारी यांना टप्याटप्याने ट्रेनिंग देण्यांत यावे असे विचार मा.

श्री. तायवाडे, संचालक यांनी व्यक्त केले. यावर मा. अध्यक्ष यांनी कंप्युटरचे प्रशिक्षण देणाऱ्या खाजगी संस्थाकडील व विद्यापीठाकडील बँकींग संबंधातील कोर्सेसची माहिती बोलाविण्यात यावी असे सांगितले. कंप्युटरवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास अधिकाऱ्यास जादाचा मोबदला देण्याबाबत मा. श्री. मु. भि. पन्नासे, संचालक म्हणाले की, कंप्युटरवर काम करणाऱ्यास जादाचे एक इंक्रिमेंट देण्यास काही हरकत नाही. परंतु असे इंक्रिमेंट देण्याबाबत सर्विस रुलशी निगडील करू नये.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कंप्युटरचे प्रशिक्षणाकरिता कंप्युटरचे प्रशिक्षण देणाऱ्या खाजगी संस्था व विद्यापिठाकडील बँकींग संबंधातील कोर्सेसची माहिती बोलाविण्यात यावी. तसेच कंप्युटरवर काम करीत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना जादा मोबदला म्हणून एक इंक्रिमेंट देण्यात यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७(३) :- माणिकलाल बरेजा पान तथा कृषि उत्पादक सहकारी शेती संस्था मर्या. रामटेक या संस्थेची शेअर्स रक्कम संस्थेच्या कर्जवसुलीत घेणेबाबत.

ठराव क्रमांक ७(३) :- मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, माणिकलाल बरेजा पान तथा कृषि उत्पादक सहकारी शेती संस्था मर्या. रामटेक या संस्थेने सन १९९४ मध्ये टॅक्टर खरेदीसाठी कर्ज घेतेवेळी बँकेचे रुपये १०२००/- चे शेअर्स खरेदी केले होते. संस्थेने कर्ज परतफेड करतांना बँक शेअर्स एवढी रुपये १०२००/- कर्जबाकी ठेवून जुलै १९९९ मध्ये पूर्ण व्याजासह कर्ज परतफेड केली आहे. संस्थेने शेअर्सची रक्कम संस्थेचे कर्ज खातेत वळती करणे बाबतचा ठराव पाठवून नोड्युज प्रमाणपत्राची मागणी केली आहे. संस्थेकडे रुपये १०२००/- कर्ज आणि जुलै १९९९ पासूनचे व्याज घेणे बाकी आहे व संस्थेचे शेअर्स रक्कम रुपये १०२००/- आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन माणिकलाल बरेजा पान तथा कृषि उत्पादक सहकारी शेती संस्था मर्या. रामटेक या संस्थेने टॅक्टर खरेदी करतांना घेतलेले बँक शेअर्स रुपये १०२००/- मागणी केल्याप्रमाणे व संस्थेचे खातेत सभासदत्व कायम राहणेकरिता आवश्यक असलेली रक्कम ठेवून वळती करण्यास मान्यता देण्यांत येत आहे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७(४) :- रामनगर शाखेकरिता किरायाने घेतलेल्या जागेबाबत

रुपये ५.०० लाख अग्रिम घेऊन १५ वर्षाचा करारनामा करणेबाबत..

ठराव क्रमांक ७(४) :- मा० अध्यक्ष यांनी सांगितले की, बँकेने रामनगर शाखेकरिता श्री राणाप्रतापसिंग यांचे मालकीच्या प्लाट क्र०३३९ वरील इमारतीमधील तळ मजल्यावरील १३५२ चौरस फुट जागा दरमहा रुपये ४/- प्रती चौरस फुट किराया व रुपये ४/- प्रती चौरस फुट मेंटेनन्स चार्जेस असे एकूण रुपये ८/- प्रती चौरस फुट प्रती माह प्रमाणे किरायाने घेतली आहे. कारपोरेशन टॅक्सचा भरणा घरमालक करणार आहे. सदर जागा किरायाने घेते वेळी घरमालकाने रुपये १०.०० लाख बिनव्याजी डिपॉजिटची मागणी करून सदर डिपॉजिटची वसुली देय भाड्यातून प्रति माह रुपये ६०००/- प्रमाणे करून घेण्याबाबत विनंती केली होती. परंतु दिनांक ३०/१२/१९९९ चे मा० व्यवस्थापक समितीचे सभेतील ठराव क्रमांक ८(२) नुसार रुपये ८/- प्रती चौरस फुट दरमहा किराया तसेच रुपये ५.०० लाख बिनव्याजी डिपॉजीट देऊन ७ वर्षाचा करारनामा करण्याबाबत ठरल्या प्रमाणे दिनांक ४/१/२००० ला करारनामा करण्यात आला. घरमालक श्री राणाप्रतापसिंग यांनी बँकेला जागा देतांना झालेल्या चर्चेनुसार बँकेने पुन्हा रुपये ५.०० लाख बिनव्याजी डिपॉजिट देण्यांत यावे व त्याबाबत संपूर्ण १५ वर्षाकरिता करारनामा करून देण्यास ते तयार असून बँकेने ठरविलेला किराया हा संपूर्ण १५ वर्षासाठी लागू राहील. १५ वर्षात ते कुठल्याही प्रकारची किरायांत वाढ मागणार नाही. अशी विनंती केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन रामनगर शाखा इमारतीचे घरमालक श्री राणाप्रतापसींग यांचेशी झालेल्या चर्चेप्रमाणे व मागणी केल्याप्रमाणे पुन्हा रुपये ५.०० लाख बिनव्याजी डिपॉजीट देऊन १५ वर्षाचा करारनामा रुपये ८/- प्रति चौरस फुट प्रती माह प्रमाणे (रुपये ४/- मेंटेनन्स व रुपये ४/- किराया) करण्यांत यावा व दरमहाचे किराया-तून रुपये ६०००/- प्रमाणे वसुली करण्यांत यावी. कार्पोरेशन टॅक्सचा भरणा स्वत: घरमालक श्री राणाप्रतापसींग करणार आहेत. याबाबत करारनामा रुपये १००/- चे स्टँप पेपरवर करण्यांत यावा. करारनामा करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष महोदय व सरव्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७(५) :- मा० अध्यक्ष यांचे मुंबई येथील प्रवासाचे प्रवास भत्ता बील रुपये १४०५०/- मंजूर करणे.

ठराव क्रमांक ८(५) :- पाणी पुरवठा योजनेसाठी निधी उभारणेबाबत मुंबई येथे दिनांक १८।४।२००० व २४।४।२००० रोजी झालेल्या सभेचे माननिय अध्यक्ष श्री. सुनिल केदार यांचे एप्रील २००० चे प्रवास भत्ता बील रुपये १५०८।- मंजूर करण्यात येत आहे. असे ठरले.

सुचक - मा. श्री. अ. रा. गुप्ता

अनुमोदक - मा. श्री. सं. लि. च्योरे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर मा० अध्यक्ष यांचे परवानगीने झालेल्या चर्चेचा वृतांत खालील प्रमाणे आहे. वैयक्तिक सदस्यांचे बाबतीत मा० श्री. मु. भि. पन्नासे संचालक म्हणाले की, बरेच सभासद म्हातारे झाले आहेत. तसेच वैयक्तीक सभासदांपैकी मृत झालेल्या सभासदांना त्यांचे शेअर्स त्यांचे वारसदारांचे नांवाने करायचे आहेत. याकरिता येणाऱ्या अडचणीबाबत माहिती विचारली असतां माननिय सरव्यवस्थापक यांनी पोटनियमातील तरतुदींची सभेला कल्पना दिली.

यावर मा० अध्यक्ष यांनी वैयक्तिक सभासद हिस्सेचे बाबतीत उपविधी मध्ये करण्यांत आलेली दुरुस्ती केव्हा करण्यांत आली त्यानंतर वारसदारांचे नांवाने वैयक्तिक शेअर्स करण्यांत आले काय? करण्यात आले असल्यास त्यांचे शेअर्स, नविन सभासदांचे (वारसदारांचे) शेअर्स काय याबाबत सविस्तर माहिती पुढील मा० व्यवस्थापक समितीमध्ये ठेवण्यांत यावी असे सांगून उपविधीनुसार नविन सदस्य होता येते काय? याबाबत कायदेशिर मत मागविण्यांत यावे, असे सांगितले.

यानंतर सभेला उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक | अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या; नागपूर.

बँकेच्या मा० व्यवस्थापक समितीची सभा सोमवार दि. २६।५।२०० रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत" बँकेचे अध्यक्ष मा० श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षते खाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

– उपस्थित –

| | |
|---|---|
| १. मा० श्री० सुनील केदार | अध्यक्ष |
| २. मा० सौ० आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. मा० श्री० अ. रा. गुप्ता | सदस्य |
| ४. मा० श्री० सं. लि. चोरे | " |
| ५. मा० श्री. वि. रा. हुळके | " |
| ६. मा० श्री. ना. र. अंभिकाटे | " |
| ७. मा० श्री. र. व्यं० निमजे | " |
| ८. मा० श्री. ब. आ. तायवाडे | " |
| ९. मा. श्री. मु. भि. पन्नासे | " |
| १०. मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| ११. मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

– अनुपस्थित –

| | |
|---|---|
| १. मा. श्री. वि. वि. निमजे | सदस्य |
| २. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर | |
| ३. मा० विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सह. संस्था (बँक), नागपूर | |
| ४. मा. विभागीय अधिकारी, महा० राज्य सह० बँक मर्या. मुंबई विभा० कार्या० नागपूर | |

---

सभेला सुरुवात करण्यापूर्वी मा. श्री. वि. वि. निमजे, सदस्य यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर सभेला उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कार्यवाहीस मा० अध्यक्ष यांनी सुरुवात केली.

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक २९.४.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक २९।४।२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले. ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक २:- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक २१.४.२००० चे सभेत पारीत झालेल्या ठरावानुसार कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची मा० सरव्यवस्थापक यांनी थोडक्यांत माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३:- बँकेचे माहे मार्च २००० मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. इतर खर्चावर चर्चा करतांना मा० अध्यक्ष म्हणाले की, बँकेच्या ऑटो रिक्षा खर्च वाढल आहे. यावर नियंत्रण ठेवणे अवश्यक आहे. ऑटोरिक्षावर झालेल्या खर्चाची संपूर्ण ब्रेकअप सह पुढील सभेत माहिती देण्यांत यावी, असे सांगितले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे मार्च २००० मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ४:- बँकेचे मार्च २०००-चे बिना तरतुद ताळेबंद पत्रक तसेच बँकेच्या तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले, की, बँकेची तरती जींदगी आज ३२% (एकूण) आहे. ही नियमापेक्षा ४% जास्त आहे, तरी यापुढे तरती जींदगी आटोक्यात ठेवावी असे सांगितले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे मार्च २०००-चे तरतुदी-पूर्वीचे ताळेबंद पत्रक तसेच बँकेच्या तरल्या जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५:- कंप्युटरवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कंप्युटर अलॉन्स देणेकरिता मान्यता देणे.

ठराव क्रमांक ५:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, दिनांक २५.४.२००० रोजीचे मागील सभेत कंप्युटरवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एक इंक्रिमेंट देण्याबाबत निर्णय घेण्यांत आला होता. परंतु निर्णयानुसार कार्यवाही करतांना तांत्रिक अडचण निर्माण

झाल्यामुळे जे कर्मचारी कंप्युटरवर काम करतात ते प्रोबेशनरी पिरेडवर असून नोकरीत कायम नाहीत व इंक्रिमेंट देणे सुरु केले नाही. त्यामुळे त्यांना इंक्रिमेंट देता येणार नाही. म्हणून मा० सेवक उपसमितीचे सभेत विषय ठेवण्यांत आला असता प्रत्यक्ष कंप्युटरवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जादा मोबदला म्हणून रुपये १५०/- प्रतिमाह कंप्युटर अलौन्स देण्यांत यावा अशी आजचे सभेस शिफारस केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कंप्युटरवर प्रत्यक्ष काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कंप्युटर अलौन्स रुपये १५०/- प्रतिमाह जुलै २००० पासून देण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६:- बँकेचे वकिलांचे पॅनेलवर नियुक्तीसाठी आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ६:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेत वकिलांचे पॅनेलवर नियुक्ती मिळणेसाठी ॲड. दिलीप केदार, ॲड. रणजीत भुईभार व ॲड. सी. डी. काळे यांचे अर्ज आलेले आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन त्यांचे कामाचा अनुभव व शैक्षणिक पात्रता विचारांत घेता ॲड. दिलीप केदार, ॲड. रणजीत भुईभार व ॲड. सी. डी. काळे यांना बँकेत वकीलांचे पॅनेलवर नियुक्ती देण्यांत यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७:- बँकेच्या सहामाही व्याज आकारणीच्या तारखेत बदल करणेबाबत..

ठराव क्रमांक ७:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना विचारले की, बँकेच्या सध्याच्या प्रचलित पध्दतीनुसार बचत ठेव वरील व्याजाची आकारणी ३१ ऑगस्ट व २८ फरवरी या प्रमाणे करण्यांत येते. इतर सर्व ठेवी व कर्जावरील व्याज मात्र ३० सप्टेंबर व ३१ मार्चला करण्यांत येते. या पध्दतीमुळे वर्ष अखेरच्या ताळेबंद वसुलीचे स्टेटमेंट, थकितांचे स्टेटमेंट, एनपीए स्टेटमेंट इत्यादी शाखाकडून येण्यास बराच विलंब होतो व त्यामुळे ३१ मार्च अखेरच्या ताळेबंद मे अखेर तयार होतो. इतर अनेक बँकांत सर्व प्रकारच्या ठेवी व कर्जावर

सहामाही व्याजाची आकारणी ३१ ऑगस्ट व २८ फरवरी अखेर करीत असल्याने त्यांचा ताळेबंद लवकर होण्यास मदत होते. आपले बँकेत ठेवी व कर्जावरिल व्याज आकारणी ३१ ऑगस्ट व २८ फरवरी अखेर करणे उचित व सोयीचे होऊ शकेल असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन ३१ मार्च अखेरच्या ताळेबंद वेळेत होण्याचे दृष्टीने बँकेतील सर्व प्रकारच्या ठेवी व कर्जावर सहामाही व्याजाची आकारणी ३१ ऑगस्ट व २८ फरवरी अखेर करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ८ :- बँकेच्या संकुल भूमिपूजन कार्यक्रमाचे जाहिरात खर्चाचे बिलास मंजूरी देणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन जाहिरातीचे पेपरवाईज पूर्ण ब्रेकअपसह हा विषय पुढील सभेत ठेवण्यांत यावा, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९ :- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ९(१) :- बँकेचे प्लँट अँड माशिनरीचे व्हॅल्युएशनसाठी पॅनेलवर घेणेकरिता आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ९(१) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, श्री. के. आर. कोन्यारी यांचा प्लँट अँड व्हॅल्युएशनसाठी बँकेच्या पॅनेलवर "व्हॅल्युअर" म्हणून नियुक्ती मिळावी याकरिता यांनी दिनांक २।४।२००० ला बँकेकडे अर्ज केलेला आहे. त्यांचे शिक्षण बी.ई. (मेकॅनिकल) झाले असून त्यांना प्लँट अँड माशिनरीजचे व्हॅल्युएशन करण्याबाबत २० वर्षाचा अनुभव आहे. त्यांचेकडे रजिस्टर व्हॅल्युअरचे लायसन्स आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन प्लँट आणि मशिनरीचे व्हॅल्युएशनसाठी बँकेच्या पॅनेलवर श्री के० आर० कोन्यारी यांना नियुक्ती द्यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९(२) :- मोहपा शाखेकरिता किरायाने घेण्यांत येणाऱ्या मोहपा ॲग्रो प्रोसेसर्स सोसा० लि०च्या जागेत करण्यांत येणाऱ्या सिव्हील व फर्निशिंग कामाचे एस्टीमेट बाबत विचार करणे व मंजूरी देणेबाबत.

ठराव क्रमांक ९(२) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मोहपा शाखेकरिता मोहपा ॲग्रो प्रोसेसर्स कोऑप. सोसा० लिमी०, मोहपा यांची जागा किरायाने घ्यायची असून त्या ठिकाणी सिव्हील व फर्निशिंगची कामे करून घ्यायची आहेत. याकरिता बँकेचे पॅनलवरील श्री चिंचमलातपूरे आर्कीटेक्ट यांना एस्टीमेट मागविण्यांत आले आहे. त्यांनी एकूण कामाचे एस्टीमेट ४% आर्कीटेक्ट फी व त्यावरील ५% सर्व्हीस टॅक्ससह रु.२१०८८८.१२ चे सादर केलेले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मोहपा शाखेकरिता मोहपा ॲग्रो प्रोसेसर्स कोऑप. सोसायटी लि., मोहपाची जागा किरायाने घ्यायची असल्याने तेथील सिव्हील व फर्निशिंग कामाचे श्री. चिंचमलातपूरे, आर्कीटेक्ट यांनी खालील प्रमाणे सादर केलेले एस्टीमेट मंजूर करण्यांत आले.

| | | |
|---|---|---|
| एकूण कामाचे एस्टीमेट | ---- | रु.२०२३८७.८३ |
| ४% आर्कीटेक्ट फी | ---- | रु. ८०९५.५१ |
| ५% (आर्कीटेक्ट फी वरील) सर्व्हिसटॅक्स | | रु. ४०४.७८ |
| | (एकूण) | रु.२१०८८८.१२ |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ९(३) :- सावनेर शाखेमध्ये सिव्हील व फर्निशिंग कामाचे एस्टीमेटबाबत विचार करणे व मंजूरी देणे बाबत.

ठराव क्रमांक ९(३) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सावनेर शाखेचे इमारतीचे बांधकाम फार जुने आहे, तेथील जागेची, कर्मचारी व ग्राहक यांचे दृष्टीकोनातून अडचण विचारांत घेता तेथे कांही सिव्हील व फर्निशिंग काम करणेकरिता बँकेचे पॅनलवरील आर्कीटेक्ट श्री चिंचमलातपूरे यांचेकडून एस्टीमेट मागविण्यांत आले आहे. त्यांनी ४% आर्कीटेक्ट फी व आर्कीटेक्ट फी वरील ५% सर्व्हीस टॅक्स सह एकूण कामाचे एस्टीमेट रुपये ३१७७८२.११ चे सादर केले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सावनेर शाखेचे इमारतीमधील सिव्हील व फर्निशिंग कामे करून घेणेकरिता श्री. चिंचमलातपूरे, आर्कीटेक्ट यांनी खालील प्रमाणे सादर केलेले एस्टीमेट मंजूर करण्यांत आले.

एकूण कामाचे एस्टीमेट - - - - - - रु. ३,०४,९७४.०८

४% आर्किटेक्ट फी - - - - - - रु. १२१९८.९६

५% (आर्किटेक्ट फीवरील) सर्व्हिस टॅक्स रु. ६०९.९५

एकूण रु. ३१७७८२.९९

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६(४) :- बँकेतील संगणकीकरण करणेकरिता शाखा हनुमाननगर, शाखा महाल व मुख्य कार्यालयातील लेखा, कर्ज / वसुली विभागाकरिता चार युपी.एस व ४० बॅटरीज खरेदी बाबत.

ठराव क्रमांक ६(४) :- मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेत जानेवारी २००० पासून संगणकीकरण करण्याचे काम सुरू आहे. कंप्युटरकरिता सतत विद्युत पुरवठा सुरू राहण्याचे दृष्टीने रामनगर शाखेत संगणक व यु.पी.एस. सह ७४ बॅटरीज लावण्यांत आल्या आहेत. त्याच प्रमाणे महाल, हनुमाननगर शाखा व मुख्य कार्यालय येथे संगणकीकरण करणे सुरू असून विद्युत पुरवठा मध्येच खंडीत झाला तरी सतत सुरु राहण्याकरिता युपीएस व बॅटरीज खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रति यु.पी.एस. रुपये ६०,०००/- प्रमाणे ४ युपीएस. व प्रती बॅटरी रुपये ९५००/- प्रमाणे ४० बॅटरीज खरेदी करावयाच्या असून याकरिता रुपये ६२००००/- खर्च येणार आहे. तथापी महाल, हनुमाननगर व मुख्य कार्यालयाचे लेखा विभागातील निकड विचारांत घेऊन ३ युपीएस. व ३० बॅटरीज खरेदी करण्याकरिता रुपये ४६५०००/- ची वर्क ऑर्डर देण्यांत आली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन संगणकाकरिता विद्युत पुरवठा खंडीत झाला तरी विद्युत पुरवठा सतत सुरू राहणेकरिता युपीएस. व बॅटरीची आवश्यकता असल्याने प्रती यु.पी.एस. रुपये ६००००/- प्रमाणे ४ युपीएस. व प्रती बॅटरी रुपये ९५००/- प्रमाणे ४० बॅटरीज रुपये ६२०,०००/- मध्ये खरेदी करण्यास मंजूरी देण्यात आली असून ३ युपीएस व ३० बॅटरीज रुपये ४६५०००/- मध्ये खरेदी करणे करिता दिलेल्या वर्क ऑर्डरची सभेत नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६(५) :- स्टेशनरी विभागातील जुन्या व जीर्ण झालेल्या लाकडी आलमाऱ्या व खुर्च्यांच्या विक्रीबाबत

ठराव क्रमांक ६(५) :- मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला

माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या स्टेशनरी विभाग, जुने हिस्लॉप कॉलेज, महाल येथील बँकेच्या इमारतीमधून मुख्य कार्यालयात हलविण्यात आलेल्या जुन्या निरुपयोगी व जीर्ण झालेल्या लाकडी खुर्च्या व १३ आलमाऱ्या बँकेतील फक्त शिपाई व ड्रायव्हर यांना रु. ५६८०/- मध्ये विकण्यांत आल्या आहेत. विक्रीपोटी प्राप्त झालेली रक्कम रुपये ५६८०/- डेडस्टॉक खाती जमा करण्यांत आली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा घेऊन बँकेतील ड्रायव्हर व शिपाई यांना निरुपयोगी झालेल्या लाकडी आलमाऱ्या व खुर्च्या विकून प्राप्त झालेली रक्कम रुपये ५६८०/- बँकेचे डेड स्टॉक खाती जमा केल्याची नोंद घेण्यांत आली.

---

कर्ज वसुलीकरिता घेण्यांत आलेल्या किरायांच्या गाड्या बाबत चर्चेचेवेळी मा० अध्यक्ष यांनी नरखेड, काटोल, मौदा, रामटेक कामठी, कुही व उमरेड करिता वसुलीसाठी १-१ गाडी ठेवण्यांत यावी व दिनांक ३१ मे २००० अखेर पासून वसुलीकरिता असलेल्या उर्वरित गाड्या बंद करण्यांत याव्या असे सांगितले.

यानंतर कोणतेही विषय सभेसमोर नसल्याने उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

व्यवस्थापक                अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., नागपूर.

बँकेच्या मा० व्यवस्थापक समितीची सभा शनिवार दिनांक १७-६-२००० रोजी दुपारी १-०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

– उपस्थित –

१. मा. श्री. सुनील केदार ---- अध्यक्ष
२. मा० सौ० आशाताई महाजन --- उपाध्यक्षा
३. मा० श्री. अ. रा. गुप्ता ------- सदस्य
४. मा० श्री. सं. लि. चोरे -------- "
५. मा० श्री. वि. रा. हुलके --- "
६. मा. श्री. र. व्यं. निमजे ---- "
७. मा. श्री. ब. भा. तायवाडे ---- "
८. मा. श्री. मु. भि. पन्नासे --- "
९. मा. श्री. चं. तु. समर्थ ---- "
१०. मा. श्री. आर. एम. कुसारी, जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर
११. मा. श्री ए. एन. चौधरी -- सरव्यवस्थापक

– अनुपस्थित –

१. मा. श्री. ना. र. जोभकाटे --- सदस्य
२. मा. श्री. वि. वि. निमजे ----- "
३. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक) नागपूर
४. मा. विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सह. बँक मर्या. विभा कार्या. नागपूर

सभेला सुरुवात करण्यापूर्वी मा. श्री. ना. र. जोभकाटे, व मा. श्री वि. वि. निमजे सदस्य यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

सभेला उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांनी सभेचे कार्यवाहिस सुरुवात केली.

विषय क्रमांक १ :- मागील सभा दिनांक २९.५.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील सभा दिनांक २९.५.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक २ :- मागिल सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागिल सभेत पारित झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची मा० सरव्यवस्थापक यांनी सभेला थोडक्यांत माहिती दिली मागील ठरावा बाबत केलेल्या कार्यवाहीबाबतचे माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली

विषय क्रमांक ३ :- बँकेच्या माहे एप्रील २००० मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे माहे एप्रील २००० मध्ये झालेल्या खर्चास मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ४ :- बँकेच्या माहे एप्रील २०००चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरता जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे माहे एप्रील २०००चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरता जींदगीच्या परिस्थिती ची नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक ५ :- बँकेच्या "संकुल" भूमीपुजन कार्यक्रमाचे जाहिरांत खर्चाचे बीलास मंजुरी देणे बाबत.

ठराव क्रमांक ५ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन "संकुल" भूमीपुजन कार्यक्रमाकरिता मे० राठी यांना दिलेल्या ऑर्डर प्रमाणे दिलेल्या विविध वर्तमान पत्रातील जाहिरातीचे रुपये ७४१९७५/- बीलास मंजूरी दिली. या जाहिरांत खर्चाचे मंजुरीनंतर "संकुल" भूमीपूजन कार्यक्रमाच्या एकुण खर्च रुपये ८३२४७५/- झाल्याची सभेत नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६ :- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ६(१) माहे जून २००० मधील मा॰ अध्यक्ष यांचे प्रवास भत्ता बीलास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ६(१) - सहकारी परिषदेला उपस्थित राहण्यासाठी मा॰ अध्यक्ष पुणे येथे गेल्यामुळे मा॰ अध्यक्ष श्री सुनील केदार यांनी सादर केलेले माहे जून २०००चे रूपये ५०६६/- चे प्रवास भत्ता बील मंजूर करण्यांत येत आहे.

सूचक - मा. श्री. अ. रा. गुप्ता

अनुमोदक - मा. श्री. र. व्यं. निमजे.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभेचे विषय आटोपल्यानंतर झालेल्या चर्चेच्या वृत्तांत खालील प्रमाणे - सेवा सहकारी/विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे माध्यमातून शेतकरी सभासदांना शेती विषयक गरजा भागविण्यासाठी बँक कर्ज पुरवठा करीत असते. ह्या संस्था आपल्या सभासदांना कर्ज पुरवठा करतांना संबंधीत राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखा "ना हरकत प्रमाणपत्र" न मागताच सेवा सह./विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे शेतकरी सभासदांना कर्जवाटप करतात. यामुळे सभासद थकीत होण्याचे प्रमाण वाढते. यावर नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने व सेवा सहकारी/विविध कार्यकारी संस्थेकडून "ना हरकत प्रमाणपत्र" न घेता कर्जवाटप करण्याची अनिष्ट प्रथा राष्ट्रीयकृत बँकांनी बंद करावी याकरिता जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँका व अग्रणी बँकेला कळविण्याची विनंती मा॰ जिल्हा उपनिबंधक/मा॰ विभागीय सहकारी निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना करणेबाबत मा॰ संचालक मंडळाचे पुढील सभेत विषय ठेवण्यांत यावा.

यानंतर उपस्थितांचे आभार मानून मा॰ अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

[signature] सरव्यवस्थापक [signature] अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या, नागपूर.

बँकेच्या मा० व्यवस्थापक समितीची सभा सोमवार दिनांक १०.७.२००० रोजी दुपारी ३.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष माननीय श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

१. मा. श्री. सुनिल केदार — अध्यक्ष
२. मा. श्री. आशाताई महाजन — उपाध्यक्षा
३. मा. श्री. अ. रा. गुप्ता — सदस्य
४. मा. श्री. सं. लि. चोरे — "
५. मा. श्री. वि. रा. हुलके — "
६. मा. श्री. ना. र. जीभकाटे — "
७. मा. श्री. ब. भा. तायवाडे — "
८. मा. श्री. मु. भि. पन्नासे — "
९. मा. श्री. चं. तु. समर्थ — "
१०. मा. श्री. ए. एन. चौधरी — सरव्यवस्थापक

- अनुपस्थित -

१. मा. श्री. वि. वि. निमजे — सदस्य
२. मा. श्री. र. व्यं. निमजे — "
३. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
४. मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था (बँक), नागपूर.
५. मा. विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सह. बँक मर्या, विभागीय कार्या नागपूर.

---

सभेला सुरुवात करण्यापूर्वी मा. श्री. वि. वि. निमजे व मा. श्री. र. व्यं. निमजे सदस्य यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

सभेला उपस्थितांचे स्वागत करून मा० अध्यक्ष यांनी सभेचे कार्यवाहीस सुरुवात केली.

विषय क्रमांक १ – मागील दिनांक १७.६.२००० रोजी झालेल्या सभेचे – प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा करतांना मा. श्री. ब. भा. तायवाडे म्हणाले की, नागपूर जिल्ह्याचे क्षेत्रांत कार्य करणाऱ्या राष्ट्रीयकृत / अर्बन बँकेने अथवा कुठल्याही

बँकेने कर्जवाटप करीत असतांना त्या कार्यक्षेत्रांत काम करीत असलेल्या इतर संस्थांचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय कर्जवाटप करू नये असे रिझर्व बँकेचे धोरण आहे. त्यामुळे मागिल सभेचे प्रतिवृत्तातील झालेल्या चर्चेमधील "यावर नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने व सेवा सहकारी / विविध कार्यकारी संस्थे कडून ना हरकत प्रमाणपत्र न घेता कर्जवाटप करण्याची अनिष्ठ प्रथा राष्ट्रियिकृत बँकांनी बंद करावी" ही शब्द रचना योग्य वाटत नाही त्याऐवजी "आर.बी.आयच्ये धोरणाप्रमाणे कुठल्याही बँकेनी कर्जवाटप करीत असतांना त्या कार्यक्षेत्रांत काम करणाऱ्या इतर संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्या शिवाय कर्ज मंजूर करू नये असे धोरण आहे. त्यास अनुसरून नागपूर जिल्ह्या तील क्षेत्रांत राष्ट्रियिकृत व अर्बन बँकेनी कर्जवाटप करतांना जिल्हा बँक, विविध कार्यकारी सहकारी संस्था, सेवा सहकारी सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे गरजेचे आहे" अशी शब्द रचना असावी असे सुचविले. मा. श्री. तायवाडे सदस्य यांनी सुचविल्याप्रमाणे मागिल सभेचे प्रतिवृत्तात दुरुस्ती घेण्यांत यावी असे मा. अध्यक्ष यांनी सांगितले.

विषयावर सविस्तर चर्चा होउन मागिल दिनांक १७।६।२०००चे सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक २ – मागिल सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागिल दिनांक १७।६।२०००चे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची मा. सरव्यवस्थापक यांनी थोडक्यांत माहिती दिली असतां ठराव क्र. ६ (१)चे बाबतीत सेवा सह. संस्था / विविध कार्यकारी संस्थांकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची प्रथा राष्ट्रीयकृत बँकेनी बंद करणेस कळविणे बाबत त्यातील प्रथा हा शब्द प्रयोग योग्य नसल्याने आर.बी.आय.चे धोरणा प्रमाणे नागपूर जिल्ह्यातील क्षेत्रांत राष्ट्रीयकृत व अर्बन बँकेनी कर्ज वाटप करतांना जिल्हा बँक, विविध कार्यकारी संस्था, सेवा सहकारी सोसा.च्ये ना हरकत प्रमाणपत्र घेणे गरजेचे आहे असे लिहावे, असे माननीय अध्यक्ष महोदय यांनी सांगितले. मा. सरव्यवस्थापक यांनी कार्यवाही बाबत दिलेल्या माहितीची नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ३ - बँकेच्या माहे मे २००० मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे मे २००० मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ४ - बँकेच्या माहे मे २०००चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेला रोखनिधी व तरल्या जिंदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या माहे मे २०००चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल्या जिंदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५ - मा. अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करणे

विषय क्रमांक ५(१) - बँकेची जीप क्र. एम.एच ३१ एच. ७५८६ विकून नविन जीप खरेदीसाठी परवानगी मिळण्यास मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ५(१) - मा. अध्यक्ष यांनी सभेला विषयानुषंगाने माहिती देतांना सांगितले की, बँकेची जीप क्र. एमएच ३१ एच ७५८६ ही गाडी रु. ३५६७६४/- ला विकत घेवून ७½ वर्षे झालेली आहेत. जून २००० अखेर पर्यंत २०२००० किलोमिटर फिरलेली आहे. ३० जून २००० पर्यंत या गाडीचे स्पेअर पार्ट व दुरुस्तीवर रु. ९९३५४/- खर्च झालेला आहे. दिवसेंदिवस गाडीच्या दुरुस्ती खर्च वाढत आहे. त्यामुळे सदर जीप लिलावाद्वारे विकून त्याऐवजी नविन जीप खरेदी करावी लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन जीप क्र. एम. एच. ३१ एच. ७५८६ च्या गाडीवर स्पेअर पार्ट व दुरुस्तीकरिता वाढत ~~असा~~ असलेला खर्च विचारांत घेता ही गाडी लिलावाद्वारे विकून नविन जीप घेण्यांत यावी असे ठरले. सदर जीप विकून नविन जीप खरेदी करणेचा प्रस्ताव परवानगी मिळण्यासाठी माननीय जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचे मार्फत माननीय

विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे पाठविण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ५(२) - थकित कर्जवसुलीसाठी व्हेईकल सिझींग अेजंट नेमणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(२) - मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, कर्ज धोरणाप्रमाणे बँकेतर्फे बँकेतर्फे बस, ट्रॅक्टर, जीप, ऑटो, ट्रक इत्यादी खरेदी करिता कर्जवाटप करण्यांत येत असते. वाहन खरेदी करिता कर्ज घेतलेले कर्जदार नियमीत कर्ज वसुली भरत नसल्याने त्यांचेकडे बँकेचे कर्ज थकलेले आहे. कर्ज वसुलीसाठी बँकेचे अधिकारी वारंवार भेटी देऊन कर्जवसुली भरण्यास सुचना देतात. विशेष वसुली अधिकाऱ्यामार्फत कर्जवसुलीकरिता नोटीस पाठविल्या जातात. परंतु कर्जवसुली भरण्यासाठी टाळाटाळ केली जाते. आपले कर्जावरील वाहन जिल्ह्यांत दुसऱ्या भागांत घेऊन जातात, कधी कधी जिल्ह्याबाहेर घेऊन जातात व त्या ठिकाणी धंदा करतात. धंद्यातून मिळालेल्या मिळकतीमधून परतफेड मात्र केली जात नाही. इकडे थकबाकी वाढत जाते. व त्यांचेकडून कर्जवसुली करणे अडचणीचे जाते. म्हणून अशा कर्जदारांकडील कर्ज वसुलीसाठी त्यांचेकडील कर्जावरील गाड्या जप्त करण्यांत याव्या, यासाठी व्हेईकल सिझींग एजंट नेमावे असे वाटते. व्हेईकल सिझींग अेजंट नियुक्ती मिळावी म्हणून श्री. पी. एम. खान यांनी बँकेकडे अर्ज केलेला आहे अर्जासोबत दिलेल्या व्हेईकल सिझींगचे रेट बाबत श्री खान यांचेशी चर्चा करण्यांत आलेली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन श्री. पी. एम. खान यांना व्हेईकल सिझींग अेजंट म्हणून नेमण्यांत यावे व व्हेईकल सिझींगचे रेट खालील प्रमाणे असावे याकरिता मान्यता देण्यांत आली.

| अ.नं. | तपशिल | लाईट व्हेईकल | हेवी व्हेईकल |
|---|---|---|---|
| १. | शहरातील (२० कि. मी. चे हद्दीतील) | रु. ४५००/- | रु. ५५००/- |
| २. | नागपूर शहराबाहेरील (नागपूर जिल्ह्याचे कार्यक्षेत्रांतील) | रु. ५५००/- | रु. ६०००/- |
| ३. | नागपूर जिल्ह्या बाहेरील | रु. ६५००/- | रु. ७०००/- |

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर मा० अध्यक्ष यांनी तालुकावाईज बँकेच्या कर्जवसुलीची माहिती वाचून दाखविली. बँकेचे मुख्य हिशोबनिस ह्या पदावर काम करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया / रिझर्व बँक / राष्ट्रीयकृत बँक येथील नुकतेच सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची यादी बोलावून त्यांतील एक अधिकारी निवडावा असे विचार माननीय अध्यक्ष यांनी व्यक्त केले.

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा मंगळवार दि. २२.८.२००० रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षते खाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित

१. मा. श्री. सुनील केदार अध्यक्ष
२. मा. सौ. आशाताई महाजन उपाध्यक्षा
३. मा. श्री. अ. रा. गुप्ता सदस्य
४. मा. श्री. सं. लि. चोरे "
५. मा. श्री. वि. रा. डुलके "
६. मा. श्री. ना. र. जीभकाटे "
७. मा. श्री. वि. वि. निमजे "
८. मा. श्री. क. भा. तायवाडे "
९. मा. श्री. र. व्यं. निमजे "
१०. मा. श्री. चं. तु. समर्थ "
११. मा. श्री. राजेश भुसारी, जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, नागपूर.
१२. मा. श्री एस. एस. गोडे प्र. व्यवस्थापक

अनुपस्थित

१. मा. श्री. मु. भि. पन्नासे सदस्य
२. मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१ सह. संस्था (बँक), नागपूर.
३. मा. विभागीय अधिकारी, म. रा. सह. बँक मर्या. लि. विभागीय कार्यालय नागपूर.
४. मा. श्री. ए. एन. चौधरी सरव्यवस्थापक

समितीचे सभेला सुरुवात करण्यापूर्वी समितीचे सदस्य मा. श्री. मु. भि. पन्नासे यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली. तसेच बँकेचे सरव्यवस्थापक श्री. ए. एन. चौधरी रजेवर असल्याने समितीचे सभेला उपस्थित नाहीत.

विषय क्रमांक १ - मागील दिनांक १०.८.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक १०.८.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

विषय क्रमांक २ - मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ - मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक १०.८.२००० रोजीचे सभेत पारित झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची मा॰ प्रभारी व्यवस्थापक यांनी सभेला थोडक्यात माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ - बँकेच्या माहे जून २००० मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ - मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयावर सविस्तर चर्चा करतांना सांगितले की, ऑटोरिक्षा वरील खर्च मागील मे २००० पेक्षा जून २००० मध्ये वाढलेला असून आटोरिक्षा खर्चावर नियंत्रण असणे आवश्यक आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे जून २००० मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

---

विषय क्रमांक ४ - बँकेचे माहे जून २०००चे ताळेबंद पत्रक तसेच बँकेच्या तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ - मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकींग रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे एकुण डिमांड ॲंड टाईम लायबीलिटीजच्या कमीत कमी ३% रोख निधी व कमित कमी २५% तरती जींदगी राखावयाची आहे. परंतु बँकेकडे आज तारखेला विहित मर्यादेपेक्षा जास्त (ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त) तरती जींदगी बँकेनी राखलेली आहे. ही बाब बँकेच्या फायद्याचे दृष्टीने हितावह नाही याकरिता बँकेचे शाखांमध्ये रोकडे स्वरूपांत जास्त निधी पडून राहणार नाही हे विचारांत घेऊन मर्यादा ठरविण्यांत याव्या.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे माहे जून २०००चे ताळेबंद पत्रक व बँकेच्या तरला जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५ - बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आलेल्या सहकारी संस्थांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५ - मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती

देतांना सांगितले की, बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आवश्यक कागदपत्र जोडून तीन कर्मचारी सहकारी पत संस्थांनी बँकेकडे अर्ज केले आहेत. अर्ज केलेल्या कर्मचारी सहकारी पत संस्थांची बँकेचे तपासणी विभागामार्फत तपासणी करण्यांत आली असून ह्या संस्था कार्यरत असल्याचे तपासणीत आढळून आले आहे व त्या संस्थांची ठेव खाती बँकेचे शाखांमध्ये सुरु आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेकडे सभासदत्व मिळणेकरिता अर्ज केलेल्या खालील कर्मचारी सहकारी पत संस्थांना बँकेचे सभासदत्व देण्याचे मान्य करण्यांत आले असून संबंधित संस्थांना सभासदत्व फी व प्रवेश फी भरणेकरिता पत्र देण्यांत यावे, असे ठरले.

| अ.क्र. | सहकारी पत संस्थेचे नांव | र.नं. | शाखा |
|---|---|---|---|
| १. | वन सर्वेक्षण कर्मचारी सह. पत संस्था म. नागपूर | ५५५९ | जिल्हा परिषद |
| २. | डागा स्मृती शासकीय रुग्णालय कर्मचारी सह. पत संस्था मर्या; नागपूर | 324 | गांधीबाग |
| ३. | विद्या शिक्षण प्रसारक मंडळ कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या; नागपूर | ५६३ | जिल्हा परिषद |

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ — मा० अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे वेळेवरचे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ६ (१) — बँकेच्या शाखा कार्यालयाकरिता घेतलेल्या इमारतींचे किराया बाबत केलेल्या कराराची मुदत संपल्यामुळे किरायाबाबत नव्याने करारनामा करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६ (१) — मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की किरायाचे ईमारतीत असलेल्या बँकेच्या पांचपावली व रेवराळ ह्या शाखांचे किरायाबाबतचे कराराची मुदत संपल्यामुळे ईमारत घरमालकांनी किराया वाढवून किरायाबाबत नव्याने करारनामा करून देणेकरिता विनंती पत्र दिले आहे. किरायाबाबत मागील करारनामा करतेवेळीच कराराची मुदत संपल्या नंतर किरायात १०% वाढ करण्यांत येईल असे नमुद केले आहे. पांचपावली शाखेचा किराया प्रतिमाह रुपये 3333/- आहे तर रेवराळ शाखेचा किराया प्रतिमाह रुपये ५८८/- सुरु आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन किरायाचे कराराची मुदत संपल्यामुळे १२१२-चौरस फुट जागेत रुपये २.७५ प्रती-चौरस फुट प्रमाणे रुपये 3333/- प्रतिमाह किरायाने असलेल्या रेवराळ शाखेचे किरायात

मागील करारांत नमुद केल्याप्रमाणे १०% म्हणजे प्रति चौरस फुट रुपये — ०.२७५ प्रमाणे येणारी रुपये ३३३/- प्रतिमाह वाढ देऊन रुपये ३६६६/- प्रतिमाह किराया रुपये ३.०२५ प्रती चौरस फुट प्रमाणे ठरविण्यांत यावा. त्याचप्रमाणे ५६६ चौरस फुट जागेत रुपये ५८२/- प्रतिमाह किरायाने असलेल्या खेराळा शाखेचे किरायाल मागील करारात नमुद केल्याप्रमाणे १०% म्हणजे रुपये ५८.२० प्रतिमाह किरायांत वाढ देऊन रुपये ६४०/- प्रतिमाह किराया ठरविण्यांत यावा असे ठरले. किरायाबाबत इमारत मालकांशी पुढील पांच वर्षाकरिता करारनामा करण्यांत यावा असेही ठरले.
किरायाबाबतच्या करारनामा बँकेचे अध्यक्ष, सरव्यवस्थापक किंवा व्यवस्थापक यांचेपैकी एकाचे सहीने करता येईल. त्यानुसार किरायाबाबतचे करारनाम्यावर सह्या करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष/सरव्यवस्थापक/व्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६(२) — दिनांक ३१.१२.२००० पर्यंत अर्धवर्षाकरिता पाठविलेल्या डिपॉझिट इंसुरन्स प्रिमीयम रक्कम रुपये ७९८५७२.३८ मंजुरी बाबत.

ठराव क्रमांक ६(२) — मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेत ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित रहाव्या याकरिता बँक ठेवीदारांच्या ठेवींचा विमा डिपॉझिट इन्सुरन्स स्किम अंतर्गत करण्यांत येत असतो ठेवीदारांच्या ठेवींचा विमा उतरविण्याचे कार्य डिपॉझिट इन्सुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन ही करीत असून ह्या संस्थेला रिझर्व बँकेनी मान्यता दिलेली आहे. आपल्या बँकेनी ३१.१२.२००० या अर्धवर्षाकरिता ठेवीदारांच्या ठेवींचा विमा डिपॉझिट इन्सुरन्स स्किम अंतर्गत काढला असून ठेवींच्या रकमेवर शेकडा २.५० प्रमाणे रुपये ७९८५७२.३८ इन्सुरन्स प्रिमीयम रक्कम डिपॉझिट इन्सुरन्स अँड क्रेडीट गॅरंटी कार्पोरेशनकडे पाठविली आहे.
विषयावर सविस्तर चर्चा होऊन डिपॉझिट इन्सुरन्स स्किम अंतर्गत बँकेतील ठेवीदारांच्या ठेवींचे रकमेवरील इन्सुरन्स प्रीमियम प्रति शेकडा २.५० पैसे प्रमाणे दिनांक ३१.१२.२००० ह्या अर्धवर्षाकरिता डिपॉझिट इन्सुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशनकडे पाठविण्यांत आलेल्या रुपये ७९८५७२.३८ या रकमेस मान्यता देऊन इन्सुरन्स प्रिमियमची रक्कम पाठविण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ६(३) — नॉमिनल सभासदांना त्यांचे ठेवींवरील व्याजाचे

वार्षिक उत्पन्न रुपये १०,०००/- व त्यापेक्षा जास्त रकमेतून टीडीएस कपात सुट मिळण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६(३) - मा॰ अध्यक्ष यांनी सभेला माहिती देताना सांगितले की, मा॰ मुख्य आयुक्त, आयकर विभाग यांचे दिनांक १२.२.१९९८च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांनी दिनांक ५.१.१९९९ रोजी परिपत्रक काढून बँकेच्या नॉमिनल सभासदांना त्यांचे ठेवीवरील व्याजाचे वार्षिक उत्पन्न रुपये १०,०००/- व त्यापेक्षा जास्त असलेल्या रकमेतून टीडीएस ची कपात करण्यास आयकर कायद्याचे कलम १९४(अ) व उपकलम(३)(v) चे अंतर्गत सवलत उपलब्ध होवु शकते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे उपविधीतील क्रमांक ९(v) व (i) नुसार असलेल्या नॉमिनल सभासदांना आयकर कायद्याचे कलम १९४(अ) व उपकलम (३)(v) चे अंतर्गत त्यांचे ठेवीवरील व्याजाचे वार्षिक उत्पन्न रुपये १०,०००/- व त्यापेक्षा जास्त असलेल्या रकमेतून टीडीएस ची कपात करण्यास सुट देण्यांत यावी व त्याकरिता परिपत्रक काढून खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या बाबींची पुर्तता करणेकरिता शाखांना कळविण्यांत यावे असे ठरले.

१. नॉमिनल सभासदांचे विस्तृत माहिती बाबत रजिस्टर शाखा स्तरावर ठेवण्यांत यावे व या रजिस्टर वरुन नॉमिनल सभासदांची माहिती दरमहा स्टेटमेंटद्वारे मुख्य कार्यालयास पाठविण्यांत यावी.

२. आर्थिक वर्षाचे शेवटी रुपये १०,०००/- व त्यापेक्षा जास्त व्याजाचे रुपांत उत्पन्न असणाऱ्या नॉमिनल सभासदांची वेगळी यादी ताळेबंद पत्रकासोबत पाठविण्यांत यावी.

३. सभासदत्वाच्या दाखला विहित केलेल्या नमुन्यात सरव्यवस्थापक/व्यवस्थापक/मुख्य लिपीक यांचेपैकी एकाचे सहीने नॉमिनल सभासदांना उपलब्ध करुन देण्यांत यावा.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६(४) - किसान क्रेडीट कार्ड वाटपाबाबत, पिक विमा योजना राबविणे बाबत पाठपुरावा करणेकरिता व स्वयं सहाय्यता गट निर्माण करणे याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६(४) - मा॰ अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करतांना मा॰ जिल्हा उपनिबंधक, यांनी खालील प्रमाणे सुचना केल्यांत. इतर जिल्हा सहकारी बँकेत किसान क्रेडीट कार्ड वाटपाचे उद्दिष्ट जवळपास पूर्ण होत आलेले आहे. आपले बँकेने सुध्दा शासनाने ठरवून किसान कार्ड वाटपाचे लक्ष पूर्ण करावे. पिक विमा योजना

कर्जदार व बिगर कर्जदार सभासदांना लागू करून ही योजना यशस्वीपणे राबविण्याकरिता पाठपुरावा करण्यांत यावा. ग्रामिण भागातील भूमिहीन मजूर, कारागीर यांच्या कर्ज विषयक गरजा भागविण्यासाठी स्वयं सहाय्यता गटाची निर्मीती करण्यांत यावी. ४% व्याज अनुदानाच्या रकमा शासनाकडून आलेल्या यादीप्रमाणे जमा झाल्याबाबत १९९७ पासून २००० पर्यंतची माहिती पुरविण्यात यावी.

यावर मा० अध्यक्ष यांनी किसान क्रेडीट कार्ड शेतकऱ्यांना वाटप करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पिक विमा योजना कर्जदार व बिगर कर्जदार सभासदांसाठी राबविली जात आहे. परंतु योजनेचे उंबरठा उत्पन्न काढण्याच्या पध्दतीनुसार समितीमध्ये स्थानिक व्यक्तिचा समावेश नसल्याची उणिव विचारांत घेऊन उंबरठा उत्पन्न काढणे-करिता असणाऱ्या समितीमध्ये त्याला क्षेत्रातील सेवा सहकारी सोसा.चे अध्यक्ष व जिल्हा परिषद सदस्य यांचा समावेश असावा असे मत व्यक्त केले. यानंतर चर्चेत भाग घेतांना मा० प्रभारी व्यव-स्थापक यांनी सांगितले की, या वर्षी पिक विमा योजना बँक राबवीत असून जून २००० पर्यंतचे कर्ज खात्यावरील पिक विमा प्रिमियमची रक्कम जनरल इन्सुरन्स कंपनीकडे पाठवित असल्याबाबत सांगून जून २००० नंतरचे पिक कर्ज खात्यावरील पिक विम्याची प्रकरणे प्राप्त होताच त्या विमा प्रिमीयमच्या रकमा जी.आय.सी कडे त्वरित पाठविणेकरिता कार्यवाही केली जाईल. या करिता संबंधीतांना सुचना दिलेल्या आहेत. स्वयं सहाय्यता गट निर्मितीबाबत लवकरच परिपत्रक काढून कार्यवाही करणेकरिता शाखांना कळविण्यात येईल, अशी सभेला माहिती दिली. तसेच मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांनी ४% व्याज अनुदानाबाबत मागविलेली माहिती काढणे सुरू असल्याचे सांगितले.

---

विषय क्रमांक ६ (५) - बँकेकरिता नविन जीप खरेदी करणेकरिता विचार करणे व निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ६ (५) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, दिनांक १०.८.२००० रोजीचे सभेत निर्णय घेऊन बँकेची जुनी जीप क्रमांक एम एच ३१ एच ७५८६ ही जाहिर लिलावाद्वारे विकून नविन जीप खरेदी करणेकरिता मा० विभागीय सह-निबंधक यांचेकडे परवानगी मागवीली आहे. बँकेकरिता नविन

जीप घेणेकरिता टोयाटा कॉलीस रुपये ६९९६७०/- व महिंद्रा मार्शल डिलक्स रुपये ४९४०१७/-चे कोटेशन प्राप्त झाले आहे. याशिवाय आर.टी.ओ. टॅक्स विमा व इतर खर्च स्वतंत्रपणे अदा करावा लागणार आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांची जुनी जीप विकणे व नविन जीप खरेदी करणेसाठी परवानगी आल्यानंतर जुनी जीप लिलावाद्वारे विकण्याकरिता व प्राप्त झालेल्या कोटेशन प्रमाणे टोयाटा कॉलीस आणि महिंद्रा मार्शल डिलक्स या पैकी एक जीपगाडी निवडून ती खरेदी करण्याबाबतचे अधिकार माननीय अध्यक्ष यांना देण्यात येत आहे, असे ठरले.

---

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

[signature] [signature]

प्रभारी व्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप. बँक मर्यादित, नागपूर.

बँकेच्या मा० व्यवस्थापक समितीची सभा सोमवार दि.२८.९.2000 रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत" बँकेचे अध्यक्ष मा०श्री०सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

१. मा. श्री. सुनील केदार — अध्यक्ष
२. मा०श्री. अ. रा. गुप्ता — संचालक
३. मा० श्री. सं. लि. चोरे — ''
४. मा०श्री. वि. वि. निमजे — ''
५. मा०श्री. ब. भा. तायवाडे — ''
६. मा. श्री. र. व्यं. निमजे — ''
७. मा. श्री. मु. त्रि. पन्नासे — ''
८. मा. श्री. चं. तु. समर्थ — ''
९. मा. श्री. राजेश भुसारी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
१०. मा. श्री. एस० एस० गोडे. प्रभारी व्यवस्थापक

अनुपस्थित

१. मा० सौ० आशाताई महाजन — उपाध्यक्षा
२. मा. श्री. वि. रा. हुलके — सदस्य
३. मा. श्री ना. र. जांभकाटे — ''
४. मा० विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह० संस्था (बँक), नागपूर.
५. मा० विभागीय अधिकारी म.रा.सह.बँक मर्या. विभागीय कार्यालय नागपूर
६. मा. श्री. अ. ना. चौधरी — सरव्यवस्थापक.

---

सभेला सुरुवात करण्यापूर्वी समितीचे मा० सौ० आशाताई महाजन, उपाध्यक्षा, मा०श्री. वि. रा. हुलके सदस्य, मा. श्री. ना. र. जांभकाटे सदस्य यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली. बँकेचे सरव्यवस्थापक श्री. अ. ना. चौधरी रजेवर असल्याने सभेला उपस्थित नाहीत. यानंतर विषय पत्रिकेवरील विषयानुसार मा० अध्यक्ष यांनी सभेला उपस्थितांचे स्वागत करून सभेचे कार्यवाहीस सुरुवात केली.

विषय क्रमांक १ – मागील दिनांक २२.८.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर

सविस्तर चर्चा होऊन मागिल दिनांक २२.८.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ - मागिल सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागिल दिनांक २२/८/२००० रोजीचे सभेत पारित झालेल्या ठरावाबाबत मा. प्रभारी व्यवस्थापक यांनी सभेत थोडक्यांत माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाही बाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आलि.

---

विषय क्रमांक ३ - बँकेचे सभासदत्व मिळणेकरिता आलेल्या सहकारी संस्थांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ३ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. बँकेचे सदस्यत्व मिळावे म्हणून दि नवोदय अर्बन कोऑप. बँक मर्या. नागपूर, सिल्वर पॅलेस, धंतोली, नागपूर यांनी बँकेकडे आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर केला आहे. बँकेचे तपासणी विभागामार्फत सदर संस्थेची तपासणी केलि असतां, सदर संस्था चालू असल्याचे निदर्शनास आले आहे. संस्थेची दि. ३/४/१९९९ ला बँक म्हणून नोंदनी झाली असून, संस्थेला रिझर्व बँकेचे लायसन्स मिळाले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन दि नवोदय अर्बन कोऑप. बँक म. नागपूर ह्या संस्थेला बँकेचे सभासदत्व देण्याचे मान्य करण्यांत आले असून सभासदत्वाकरिता आवश्यक फी व प्रवेश फी भरण्यास कळविण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ४ - बँकेच्या माहे जुलै २००० मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ४ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या माहे जुलै २००० मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५. बँकेच्या माहे जुलै २०००चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ५ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या माहे जुलै २०००चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला निधीच्या परिस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ६ - बँकेचे मुख्याधिकारी व व्यवस्थापक या श्रेणीतील - अधिकाऱ्यांचे ठरविलेल्या वेतनश्रेणीस मान्यता देणे.

ठराव क्रमांक ६ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा. वेज बोर्डाने नमुद केलेल्या शिफारसीनुसार नविन वेतनश्रेणी, महागाई भत्ता व इतर सवलती दिनांक १ एप्रिल २००० पासून बँकेतील कर्मचाऱ्यांना लागु करण्यांत आल्या आहेत. त्यांत मुख्याधिकारी व व्यवस्थापक यांचा समावेश नसल्याने त्यांनी केलेल्या विनंतीवर विचार करून व्यवस्थापक व मुख्याधिकारी यांचेकरिता नविन वेतनश्रेणी व इतर सोयी सवलती ठरविण्यांत आल्या आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेचे व्यवस्थापक व मुख्याधिकारी यांचेकरिता खालीलप्रमाणे ठरविण्यांत आलेली नविन वेतन श्रेणी, महागाई भत्ता व इतर भत्ते इतर सोयी सवलती दिनांक १.८.२००० पासून लागू करणेत याव्या असे ठरले.

१. नविन वेतनश्रेणी -

अ) व्यवस्थापक - रु. १००-६०-१२००-८०-१६५०-१२०-२२५०-१५०-२५५०-२००-३८५०-२५०-४२००.

ब) मुख्याधिकारी - रु. ७५०-४०-९५०-६०-१२५०-८०-१६५०-१२०-२०३०-१५०-२४८०-२००-३९८०.

२. महागाई भत्ता - मुळ पगारावरील महागाईची सिलींग मर्यादा रु. ८०००/-

३. घरभाडे भत्ता - मुळ पगार अधिक महागाई मिळून येणाऱ्या रकमेच्या ५% प्रमाणे दरमहा.

४. शैक्षणिक भत्ता - रु. ७५/- प्रमाणे प्रतिमाह (जास्तीतजास्त ३ मुलांपर्यंत)

५. वैद्यकिय भत्ता - रु. १५०/- प्रमाणे प्रतिमाह.

६. लिव्हफेअर कन्सेशन - जास्तीत जास्त १५०० कि.मी पर्यंत ३ वर्षातून एकदा अधिकारी स्वत: त्यांची पत्नी व २ मुलांपर्यंत अवलंबित आई व वडिल यांना प्रत्यक्ष येणारा खर्च. रेल्वे प्रथम श्रेणी किंवा द्वितीय श्रेणी ए.सी. अधिक प्रत्यक्ष होणारा टॅक्सी खर्च.

७. बँकेच्या कामानिमित्त दौऱ्यावर असतांना द्यावयाचा भत्ता -

अ) पूर्ण दिवस - १२ तास ते २४ तासापर्यंत रुपये १००/- प्रमाणे.

ब) अर्धदिवस - ६ तास ते १२ तासापर्यंत रुपये ५०/- प्रमाणे

क) ------- - ६ तासापेक्षा कमी - निरंक -

वरील सोयी सवलती व्यतिरिक्त मा. वेज बोर्डाचे शिफारशीनुसार इतर कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या सोयी सवलती लागू राहतील.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ७ - बँकेने मुख्य कार्यालय व शाखांमध्ये रोख ठेवण्याची मर्यादा ठरविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. बँकींग रेग्युलेशन ॲक्ट कलम १८ अनुसार ठेवी व इतर देयतेच्या कमीत कमी ३% पर्यंत रोख व बँकेतील शिल्लक ठेवणे आवश्यक असल्याने मागील वर्षापेक्षा वाढलेल्या दिनांक ३१ मार्च २००० च्या बँकेच्या शाखांमधील ठेवी, मुख्य कार्यालयापासून शाखेचे अंतर व इतर अन्य बाबी विचारांत घेऊन मुख्य कार्यालय व शाखांमध्ये रोख ठेवण्याच्या मर्यादा खालीलप्रमाणे ठरविण्यांत आल्या आहेत. (रु. लाखांत)

| अ.क्र. | शाखा. | एकूण ठेवी (३१.३.२०००) | सध्याची मर्यादा | वाढ | नविन मर्यादा. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मुख्य कार्यालय | ६५६४४.४० | १८०.०० | ९५.०० | २७५.०० |
| २. | महाल | २१०८.५० | २९.०० | ३१.०० | ६०.०० |
| ३. | हनुमाननगर | ७३६.३६ | १६.०० | ६.०० | २२.०० |
| ४. | जिल्हा परिषद | ३१५६.५५ | ३०.०० | १५.०० | ४५.०० |
| ५. | गांधीबाग | ५९६.७२ | १२.०० | ५.०० | १७.०० |
| ६. | पांचपावली | ४६९.५२ | १०.५० | ३.५० | १४.०० |
| ७. | रामनगर | १७२४.४६ | २५.०० | २३.०० | ४८.०० |
| ८ | धंतोली | ८६८.८० | १४.०० | ६.०० | २०.०० |
| ९. | धान्यगंज | १६६.५४ | ३.८० | २.२० | ६.०० |
| १०. | सक्करदरा | २६६.०८ | ४.०० | ३.०० | ७.०० |
| ११. | गणेशपेठ | ५०९.१२ | १०.०० | ५.०० | १५.०० |
| १२ | कळमना बाजार | २१७.११ | ५.०० | २०.०० | २५.०० |
| १३. | पेठ | ३०६.९६ | ७.०० | २.०० | ९.०० |
| १४. | बुटीबोरी | ५५५४.९६ | १४.६० | १.४० | १६.०० |
| १५. | विहिरगांव | ११५.८२ | २.५० | १.०० | ३.५० |
| १६. | फेटरी | १३१.७८ | २.८० | १.२० | ४.०० |
| १७. | हिंगणा | ७८१.६३ | १६.०० | ७.०० | २३.०० |
| १८ | कान्होलीबारा | ११८.४७ | ३.३० | ०.१० | ३.४० |
| १९ | गुमगांव | १९२.६४ | ४.५० | ०.६० | ५.१० |
| २०. | यकहवार | ८०.४७ | २.१० | ०.१० | २.२० |
| २१. | कवडस | ३३.८३ | ०.९० | ०.१० | १.०० |
| २२. | कामठी | ४२१.५५ | १०.०० | २.५० | १२.५०. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| २३ | बडोदा | १३२.६३ | ३.०० | ०.९० | ३.९० |
| २४ | दिघोरी स्टेशन | ५८८२ | १.५० | ०.५० | २.०० |
| २५ | कोराडी | ४८१.७५ | १०.४० | ४.०० | १४.४० |
| २६ | वाडी | १०४.७२ | २.३० | ०.७० | ३.०० |
| २७ | जरीपटका | १८०.९२ | ४.१० | ०.९० | ५.०० |
| २८ | मोहगांव झिल्पी | १५६.७० | ३.५० | १.०० | ४.५० |
| २९ | सावनेर | १०२७.९१ | २५.०० | ५.०० | ३०.०० |
| ३० | पाटणसावंगी | ३६६.७७ | ९.०० | २.०० | ११.०० |
| ३१ | खापा | ४९७.०५ | १०.९० | २.६० | १३.५० |
| ३२ | बडेगांव | ६६.६६ | १.४० | ०.६० | २.०० |
| ३३ | केळवद | २६३.६५ | ५.९० | २.१० | ८.०० |
| ३४ | नांदागोमुख | १५७.७७ | ३.९० | ०.६० | ४.५० |
| ३५ | खापरखेडा | ५११.३४ | १०.५० | ४.५० | १५.०० |
| ३६ | कळमेश्वर | ७४४.६५ | १६.८० | ५.२० | २२.०० |
| ३७ | मोहपा | २४९६६ | ५.५० | १.५० | ७.०० |
| ३८ | धापेवाडा | २०७.१६ | ४.५० | १.५० | ६.०० |
| ३९ | कोहळी | १४७.९८ | ३.५० | ०.५० | ४.०० |
| ४० | रामटेक | ४३५.४८ | १३.०० | २.०० | १५.०० |
| ४१ | पवनी | १२५.९० | २.८० | ०.७० | ३.५० |
| ४२ | देवळापार | ७५.०८ | १.९० | ०.१० | २.०० |
| ४३ | मौदा | ३८४.६६ | १०.०० | २.०० | १२.०० |
| ४४ | तारसा | १२८५३ | ३.६० | ०.२० | ३.८० |
| ४५ | अरोली | ९०.०१ | २.२० | ०.३० | २.५० |
| ४६ | खात | १०८.९९ | २.९० | ०.३० | ३.२० |
| ४७ | धानला | १०१.६४ | २.६० | ०.४० | ३.०० |
| ४८ | मारोडी | १४४.९४ | ३.९० | ०.४० | ४.३० |
| ४९ | रेवराळ | ७१.८६ | १.७० | ०.३० | २.०० |
| ५० | पारशिवनी | ७९९.९९ | १३.२० | ९.८० | २३.०० |
| ५१ | कन्हान | ४८८.७८ | ११.४० | २.६० | १४.०० |
| ५२ | उमरेड | ५८२.६३ | १२.१० | ४.९० | १७.०० |
| ५३ | सिर्सी | १८६.२७ | ४.२० | ०.८० | ५.०० |
| ५४ | बेला | ५०२.१० | १०.८० | २.७० | १३.५० |
| ५५ | पांचगांव | २१२.२१ | ५.०० | १.०० | ६.०० |
| ५६ | मकरधोकडा | १०५.४१ | २.५० | ०.५० | ३.०० |
| ५७ | ब्राह्मणी | ४८.०० | १.२० | ०.२० | १.४० |
| ५८ | शेडेश्वर | ८९.४५ | २.६० | — | २.६० |
| ५९ | कुही | ४३८.६३ | ११.०० | २.०० | १३.०० |
| ६० | वेलतुर | १३७.९९ | २.७० | १.३० | ४.०० |
| ६१ | मांढळ | १४८.९९ | ३.६० | ०.४० | ४.०० |
| ६२ | गोठणगांव | ६४८४ | १.२० | ०.७० | १.९० |
| ६३ | भिवापूर | २७१.०४ | ६.६० | १.४० | ८.०० |
| ६४ | नांद | ९८.२४ | २.७० | ०.२० | २.९० |
| ६५ | बेसूर | ६५.९२ | १.४० | ०.६० | २.०० |
| ६६ | जवळी | ४८.७४ | ०.९० | ०.५० | १.४० |
| ६७ | नरखेड | ३५१.३९ | १०.०० | ०.५० | १०.५० |
| ६८ | मोवाड | १८२.६० | ३.०० | १.०० | ४.०० |
| ६९ | जलालखेडा | २३८.२४ | ६.०० | १.०० | ४.०० |
| ७० | सावरगांव | २४३.११ | ५.७० | १.५० | ७.२० |
| ७१ | पिपळ केवळराम | ६८१४ | १.५० | ०.५० | २.०० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ७२ | लोहरी सावंगा | ६७.०९ | १.२० | ०.८० | २.०० |
| ७३ | थडिपवनी | ८४.६४ | २.१० | ०.४० | २.५० |
| ७४ | बेलोना | ८१.५६ | २.०० | ०.४० | २.५० |
| ७५ | काटोल | ४९५.६२ | १२.३० | ४.७० | १७.०० |
| ७६ | कोंढाळी | ३६४.६३ | ७.५० | २.५० | १०.०० |
| ७७ | रिधोरा | १९२.५० | ४.४० | १.३० | ५.७० |
| ७८ | येणवा | ९३.६२ | २.०० | ०.८० | २.८० |
| ७९ | पारडसिंगा | १९९.५८ | ३.५० | १.५० | ५.०० |
| ८० | मेटपांजरा | ९२.३४ | १.९० | ०.८० | २.७० |
| ८१ | नवेगांव (खैरी) | ५६.९२ | १.२० | ०.३० | १.५० |
| ८२ | मनसर | १५०.३९ | ४.२० | ०.३० | ४.५० |
| ८३ | मेंढला | ६७.४१ | १.८० | ०.२० | २.०० |
| ८४ | अडेगांव | ३२.०७ | ०.८० | ०.२० | १.०० |
| ८५ | गोवरी | १०७.५५ | २.७० | ०.३० | ३.०० |
| ८६ | नगरधन | ५८.०३ | १.२० | ०.५० | १.७० |
| ८७ | झिंगाबाई टाकळी | — | १.०० | १.०० | २.०० |
| | एकूण बेरीज | ३५३३६.९४ | ७४०.१० | ३१९.९० | १०९०.०० |

वरील प्रमाणे ठरविण्यांत आलेल्या मुख्य कार्यालय व शाखांमध्ये ठेवण्याच्या मर्यादेला सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ८ – सहकारी उपसा जलसिंचन प्रकल्पा अंतर्गत पंपींग मशिनरीच्या सुरक्षेच्या दृष्टीने बँकेने संस्थांचे वतीने विमा नुतनीकरण करणे बाबत विचार करणे व निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ८ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. सन १९८९ ते सन १९९४ या कालावधीत ७ सहकारी जलसिंचन योजना कार्यान्वित करून संबंधित सहकारी उपसा जलसिंचन संस्थांना हस्तांतरीत करण्यांत आल्या आहेत. या सात उपसा जलसिंचन प्रकल्पापैकी मोहखेडी (मौदा) येथील पुरामुळे तर किरणापूर (रामटेक) येथील विद्युत बील थकल्यामुळे बंद आहेत. बंद पडलेले प्रकल्प पुन्हा चालु करणेकरिता प्रयत्न करण्यांत आले. परंतु सभासदांकडून योग्य प्रतिसाद व सहकार्य प्राप्त झाले नाही. वरील संस्थाकडून कर्ज वसुली होणे बंद झालेले आहे. बँकेतर्फे कर्जवसुली करिता प्रयत्न करण्यांत आले. परंतु कर्ज माफ होणार या आशेने त्यांनी कर्जवसुली भरली नाही. कर्जवसुली भरण्याकडे त्यांची मानसिकता नाही व इच्छाही नाही असे दिसून येते. योजनांच्या पंपींग मशिनरीच्या विमा सुध्दा ह्या संस्था काढीत नाही. म्हणून सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पंपींग मशिनरीच्या विमा बँक काढीत असते. यावर्षी सुध्दा या सातही योजनेचे पंपींग मशिनरीच्या विमा नुतनीकरण

प्रव्याजीपोटी रुपये ९५५१०/- विमा कंपनीकडे भरायचे आहे.

विषयावर चर्चा करतांना उपसा जलसिंचन योजनेचे जे प्रकल्प बंद पडले आहेत, ज्या संस्थांचे सभासदांची कर्जवसुली देण्याची मानसिकता नाही व ईच्छाही नाही अशा बंद पडलेल्या सातही संस्थाची माहिती घेवुन अवसायनात काढाव्या. अवसायनात काढल्या नाहि तर दोन-चार वर्षानंतर ह्या मशिनरी पंप खराब होवुन त्यापासून कांहिच मिळणार नाही. तथापी आज अवसायनात काढल्या तर चांगल्या स्थितीत असलेल्या मशिनरी पंपापासून कांही तरी रक्कम वसुल मिळेल व वसुली होवु शकेल. असे विचार मा० जिल्हा उपनिबंधक सह० संस्था, नागपूर यांनी व्यक्त केले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन नैसर्गिक आपत्तीमुळे बंद पडलेल्या सोसायटीचे सभासदांमध्ये कोआरडीनेशन नसल्यामुळे पुन्हा कार्यान्वित न झालेल्या संस्था तसेच उपसा जलसिंचन संस्थांकडून कर्जवसुलीचे संदर्भात सहकार्य नाही. ज्या संस्थांचे सभासदांकडून कर्जवसुली देण्याची मानसिकता नाही व ईच्छाही नाही. अशा संस्थांवर बँकेचा अधिकारी प्रशासक म्हणून नेमण्यात यावा. त्याकरिता मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर ह्या सातही संस्थांचे आर्थिक परिस्थिती, कर्जवाटप, कर्जबाकी, कर्जमागणी, कर्जवसुली इत्यादि विषयी माहिती पाहवून ह्या संस्थावर बँकेचा अधिकारी प्रशासक म्हणून नेमण्यात यावा. याकरिता कार्यवाही करणेस विनंती करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ६ - खाते चौकशी करण्यासाठी बँकेचे पॅनेलवर खाते चौकशी अधिकारी म्हणून घेणेकरिता आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ६ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले, विषयावर सविस्तर चर्चा होऊन सहकार विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी श्री. एल० आर० देशमुख यांना शासनाने दिलेल्या नियुक्ती प्रमाणे सध्या प्रमाणित लेखा परिक्षक म्हणून काम करीत असल्याने व त्यांचे कामाच्या अनुभव शैक्षणिक पात्रता विचारात घेता त्यांनी बँकेचे पॅनेलवर खाते चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात यावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १० : बँकेचे संगणकीकरणावर केलेल्या खर्चाची व संगणकाची माहिती देणे.

ठराव क्रमांक १० - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले बँकेत छत्तीस संगणक संच मे. न्याती इन्फोसिस यांचेकडून बँकेच्या मुख्य कार्यालय, रामनगर, हनुमाननगर जिल्हा परिषद व महाल या शाखांमध्ये बसविण्यांत आले आहेत. आवश्यकतेनुसार संगणकासोबत सर्वर, प्रिंटर, हब, स्कॅनर, मॉडेम, ड्राइव्ह मल्टी मी. किट, स्पिकर माईक सीडी राईटर इत्यादि सामान सुध्दा खरेदी करण्यांत आले आहे. याशिवाय मुख्य कार्यालयांत १ लेझर प्रिंटर आहे. याकरिता संगणक साहित्यावरील ऑक्ट्राय रुपये ३५५५५/- सह एकूण रुपये ३५०३९५५/- खर्च झालेला आहे. तसेच मुख्य कार्यालय, हनुमाननगर, जिल्हा परिषद, महाल, रामनगर शाखेत एकेक युपीएस व बॅटरीज लावण्यांत आल्या आहेत. त्यावर ऑक्ट्राय सह रुपये १९३४५/- सह रुपये ९१८६००/- खर्च झालेला आहे.

बँकेतील संगणकीकरणावर केलेल्या खर्चाची व संगणकाबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ११ - मा० अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर विचार करणे.

विषय क्रमांक ११ (१) - शाखा कोंढाळी येथील नविन इमारतीत बसविलेल्या स्ट्रॉंग डोअर व लॉकर्स बाबत माहिती देणे.

ठराव क्रमांक ११ (१) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या कोंढाळी शाखेच्या स्वमालकीच्या जागेवर इमारतीचे बांधकाम सुरु आहे. ग्राहकांना लॉकर्सची सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता स्ट्रॉंगरुम डोअर व ५१ कप्प्याचे लॉकर खरेदी करुन बसविण्यांत आले आहे. याकरिता झालेला खर्च खालीलप्रमाणे आहे.

1. स्ट्रॉंगरुम डोअर १ नग . . . . . . - रु. ८०१३३/-
2. ५१ कप्प्याचे लॉकर - - - - - - - - रु. ७६३३९/-
3. स्ट्रॉंगरुम बसविण्याचा खर्च - - - - - रु. ३३००/-
4. लॉकर बसविण्याचा खर्च - - - - - - रु. २५००/-
5. स्ट्रॉंगरुम डोअर व लॉकर वाहतुक खर्च रु. ४५०/-

एकूण खर्च रु. १६२७२२/-

शाखा कोंढाळी येथील नविन इमारतीत बसविलेले स्ट्रॉंगरुम डोअर व लॉकर्सबाबत दिलेल्या माहितीची व खर्चाची सभेत नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषयक्रमांक ११(२) - सहकारी संस्थांकडून सरकारचे वित्तमुक्ती धोरणाबाबत बँकेचे संचालक/वरिष्ठ अधिकाऱ्यांकरिता पुणे येथे आयोजित केलेल्या विशेष कार्यक्रमा बाबत...

ठराव क्रमांक ११(२) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगीतले की, वैकुंठ मेहता राष्ट्रिय सहकारी प्रबंध संस्थान, पुणे यांनी दिनांक २०.११.२००० ते २३.११.२००० या कालावधीत सहकारी संस्थांकडून सरकारचे वित्तमुक्ती धोरण लक्षात घेता संदर्भात सविस्तर चर्चा करून धोरण ठरविण्याचे दृष्टीने सहकारी बँकेचे संचालक/वरिष्ठ अधिकारी यांचेकरिता चर्चासत्र आयोजीत केले आहे. चर्चासत्रात प्रामुख्याने सहकारी संस्थांमध्ये भांडवल उभारणी, सरकारपासून वित्तमुक्ती मिळणे साठी सर्वसाधारण जागृती निर्माण करणे याकरिता आवश्यक सुदृढ उपाय योजना करणे यावर चर्चा केली जाणार आहे. या कार्यक्रमाकरिता रु.4000/-(रु.चार हजार) प्रति सभासद पार्टीसिपेशन फी सहकारी प्रबंध संस्थान, पूणे यांचेकडे पाठवावी लागणार असून, नामांकन भरण्याची शेवटची तारीख ८.११.२००० आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन पुणे येथील दि.२०.११.२००० ते २३.११.२००० या कालावधीत आयोजीत केलेल्या सहकारी संस्थाकडून सरकारचे वित्तमुक्ती धोरण ठरविण्याचे दृष्टीने चर्चासत्रांत भाग घेणेसाठी जाणेकरिता बँकेचे संचालकांचे संमतीपत्र मागवावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ११(३) - बँकींग रेग्युलेशन अॅक्ट १९४९ कलम ३१ प्रमाणे बँकेचे नफातोटा पत्रक, ताळेबंद पत्रक लेखा परिक्षकाचे प्रमाण पत्रा सह प्रसिध्द करणेसाठी मुदतवाढ मिळावी म्हणून विनंती करणे.

ठराव क्रमांक ११(३) - बँकींग रेग्युलेशन अॅक्ट १९४९चे कलम ३१नुसार बँकेचे दिनांक ३१ मार्च २००० ला संपणाऱ्या वर्षाचे नफातोटा पत्रक व ताळेबंद पत्रक लेखा परिक्षकाचे प्रमाणपत्रासह प्रसिध्द करण्यासाठी मुदतवाढ मिळावी याकरिता रिझर्व बँकेकडे विनंती करणे साठी खालीलप्रमाणे ठराव करण्यांत येत आहे.

- RESOLUTION -

"Resolved that Reserve Bank of India be and

is requested to grant extension upto 31.12.2000 under section 31 of Banking Regulation Act 1949 for publication/submission of Balance sheet, profit and loss accounts for the year ending 31.3.2000 alongwith auditor's certificate."

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ११(४) - बँकेच्या शाखा असलेल्या ठिकाणी पक्क्या इमारती बांधणेबाबत.

ठराव क्रमांक ११(४) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, शाखेचे ठिकाणी बँकेची स्वमालकीची इमारत असावी ही गोष्ट खरी आहे त्याची शाखेचे व्यवहाराची उलाढाल शाखेचा व्यापार विषयक बुझिनेस, शाखेचा परफारमन्स इत्यादि पाहूनच शाखेच्या ठिकाणी बँकेची स्वमालकीची इमारत बांधणेबाबत विचार करावा लागेल. याबाबतचा धोरणात्मक निर्णय बँकेचे मा० संचालक मंडळाचे सभेत घ्यावा लागेल. यावर मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर म्हणाले की, बँकेचे शाखेचे ठिकाणी स्वमालकीची इमारत नसली तरी तालुक्याचे ठिकाणी शाखा कार्यालयासाठी स्वमालकीची पक्की इमारत असावी. यासंदर्भात माननीय अध्यक्ष यांनी बँकेच्या शाखा प्रत्येक तालुक्याचे ठिकाणी असून भिवापूर तालुक्यातील शाखा सोडल्यास इतर तालुक्याचे ठिकाणी बँकेच्या स्वमालकीच्या शाखा कार्यालयासाठी पक्क्या इमारती आहेत. भिवापूर येथे शाखा कार्यालयासाठी पक्की इमारत बांधणेसाठी जागा मिळावी म्हणून मागील २ वर्षापासून प्रयत्न करण्यांत आलेत. कृषि उत्पन्न बाजार समितीला जागा उपलब्ध करून देण्याबाबत सुध्दा विनंती करण्यांत आली. परंतु तेथे जागा मिळाली नाही. याकरिता भिवापूर येथे बँकेची पक्की इमारत बांधणेसाठी जागा उपलब्ध करून देण्यांत यावी, म्हणून मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना पत्र लिहून विनंती करावी असे सांगितले.

विषय क्रमांक ११(५) - बँकेतील कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त दिवाळी पेशगी (फेस्टिवल ॲडव्हान्स) मंजूर करणे.

ठराव क्रमांक ११(५) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेतील कर्मचाऱ्यांच्या मान्यताप्राप्त युनियनने बँकेकडे दिवाळी पेशगीची मागणी केलेली आहे. दरवर्षी आपण बँकेतील कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी देत असतो व ही पेशगीची रक्कम कर्मचाऱ्यांचे दरमहा पगारातून समान १० मासिक हप्त्यात कपात करण्यांत येते. विषयावर

सविस्तर चर्चा होऊन बँकेतील कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे दिवाळी पेशगी नेहमीचे अटीवर मंजूर करण्यांत आली.

अ) लिपीक श्रेणी ते अधिकारी श्रेणी - - रु.५०००/-

ब) ड्रायव्हर व चपराशी श्रेणी - - - - रु.४०००/-

सदर पेशगीचे वाटप दिवाळीपूर्वी म्हणजे दि. २५.१०.२००० पर्यंत करण्यांत यावे. यानंतर या कारणाकरिता पेशगी मिळणार नाही. सदर पेशगीची वसुली माहे नोव्हेंबर २०००चे पगारापासून समान १० मासीक हप्त्यांत करण्यांत यावी इतर अटी नेहमीच्याच राहतील असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

प्रभारी व्यवस्थापक | अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमी, नागपूर

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा बुधवार, दिनांक २५.१०.२००० रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत" बँकेचे अध्यक्ष मा० सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

– उपस्थित –

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा. श्री. अ. रा. गुप्ता | सदस्य |
| ४. | मा. श्री. सं. लि. चोरे | " |
| ५. | मा. श्री. वि. रा. हुलके | " |
| ६. | मा. श्री. ना. र. जीभकाटे | " |
| ७. | मा. श्री. बि. वि. निमजे | " |
| ८. | मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| ९. | मा. श्री. मु. भि. पन्नासे | " |
| १०. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| ११. | मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

– अनुपस्थित –

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. ब. भा. तायवाडे | सदस्य |

२. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
३. मा० विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था (बँक) नागपूर.
४. मा. विभागीय अधिकारी, म.रा. सह. बँक मर्या. विभागीय कार्यालय, नागपूर

---

सभेला सुरुवात करण्यापूर्वी समितीचे सदस्य मा. श्री. ब. भा. तायवाडे यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली. यानंतर सभेला उपस्थितांचे स्वागत करुन विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस मा. अध्यक्ष यांनी सुरुवात केली.

विषय क्रमांक १ – मागील दिनांक १८.९.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा करतांना मागील सभेत बँकेच्या शाखामध्ये रोख ठेवण्याच्या मर्यादा ठरविण्यांत आल्या असल्या तरी शाखांमध्ये रोख शिल्लक ठेवण्याकरिता ठरविण्यात आलेल्या मर्यादा याबाबत ३० सप्टेंबर २००० ची स्थिती विचारात घेउन आढावा घेण्यांत यावा व ही माहिती पुढील सभेत

विचारार्थ ठेवावी. तसेच बँकेच्या स्वमालकीच्या शाखा इमारती असाव्या ह्याकरिता मा० संचालक मंडळाचे सभेत धोरण व नियम निश्चित करावे लागेल. धोरण व नियम बाबत चर्चा करतांना ज्या शाखा नफ्यात आहेत आणि त्यांच्या ठेवी ८.०० कोटीच्या वर आहेत अशा ठिकाणी स्वमालकीच्या पक्क्या इमारती बांधण्यात याव्या असे मत पडले. विषयावर सविस्तर चर्चा होउन मागिल दिनांक १८.९.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ - मागिल सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागिल दिनांक १८.९.२००० रोजी पारित झालेल्या सभेतील ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यांत माहिती मा० सरव्यवस्थापक यांनी सभेला दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ - बँकेच्या माहे ऑगस्ट २००० मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा करतांना मा० अध्यक्ष म्हणाले की, बँकेचे मुख्य कार्यालयांतील चहापान खर्च कमी झालेला आहे. परंतु शाखांमधील चहापान खर्चावर नियंत्रण नसल्याचे सादर केलेल्या माहितीवरुन दिसून येते. तरी चहापान खर्चावर नियंत्रण ठेवणेकरिता व खर्च कमी करणेकरिता शाखांना निर्देश द्यावेत. विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या माहे ऑगस्ट २००० मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

---

विषय क्रमांक ४ - बँकेच्या माहे ऑगस्ट २००० चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल्या जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या माहे ऑगस्ट २००० चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल्या जींदगीच्या परिस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५ - बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आलेल्या सहकारी संस्थांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. बँकेचे सदस्यत्व मिळणेकरिता दि दिपलक्ष्मी महिला गृहउद्योग औद्योगिक सहकारी संस्था मर्या, नागपूर आणि जयभवानी शेळीमेंढी पशुपालन सहकारी संस्था मर्या, जायलापुर ता. काटोल ह्या संस्थांनी बँकेकडे आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर केले आहे बँकेचे तपासणी विभागामार्फत ह्या संस्थांची तपासणी केली असता, सदर संस्था कार्यरत असल्याचे निदर्शनास (आढळून) आले आहे. विषयावर सविस्तर चर्चा होऊन दि दिपलक्ष्मी महिला गृहउद्योग औद्योगिक सहकारी संस्था मर्या. नागपूर व जयभवानी शेळीमेंढी पशुपालन सहकारी संस्था मर्या, जायलापुर ह्या संस्थांना बँकेचे सभासदत्वाकरिता आवश्यक फी व प्रवेश फी भरण्यास कळविण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ - मा० अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

ठराव क्रमांक ६ - महाराष्ट्र स्टेट कोऑप. बँकर्स असोसिएशन मुंबई यांचे वतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या पारितोषिकांसाठी यावर्षी आपल्या बँकेची विदर्भ विभागातून प्रथम पारितोषिकाकरिता निवड झाल्यामुळे पारितोषिक (ढाल व प्रमाणपत्र) वितरणाचे दिनांक २५.९.२०००चे मुंबई येथील कार्यक्रमास मा० अध्यक्ष महोदय श्री सुनील केदार गेले होते. त्याबाबतचे माननीय अध्यक्षांचे माहे सप्टेंबर २०००चे प्रवास भत्ता बील रुपये ७५४०/- मंजूर करण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर सभेसमोर कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(सही) सरव्यवस्थापक (सही) अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमि, नागपूर.

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा मंगळवार दिनांक १४.११.२००० रोजी दुपारी १.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात बँकेच्या उपाध्यक्षा माननीय सौ. आशाताई महाजन यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली.
या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

| | | |
|---|---|---|
| १. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा तथा सभाध्यक्षा |
| २. | मा. श्री. अ. रा. गुप्ता | सदस्य |
| ३. | मा. श्री. सं. लि. चोरे | " |
| ४. | मा. श्री. ना. र. जोगेकाटे | " |
| ५. | मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| ६. | मा. श्री. मु. भि. पन्नासे | " |
| ७. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| ८. | मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

- अनुपस्थित -

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. वि. रा. हुलके | सदस्य |
| ३. | मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| ४. | मा. श्री. ब. भा. तायवाडे | " |

५. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
६. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (बँक), नागपूर.
७. मा. विभागीय अधिकारी, म. रा. सह. बँक म. विभागीय कार्यालय, नागपूर

मा. श्री. सुनील केदार, अध्यक्ष, आवश्यक कामानिमित्ताने मुंबईला गेले असल्याने सभेला अनुपस्थित आहेत. तसेच समितीचे सदस्य श्री वि. रा. हुलके श्री. र. व्यं. निमजे व श्री. ब. भा. तायवाडे सभेला अनुपस्थित आहेत. सभेला सुरुवात करण्यापूर्वी समितीचे अध्यक्ष श्री. सुनील केदार व समीतीचे सदस्य श्री हुलके, श्री तायवाडे व श्री. र. व्यं. निमजे यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यात आली व यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यात आली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कामकाजास बँकेच्या उपाध्यक्षा मा. सौ. आशाताई महाजन यांनी सुरुवात केली.

विषय क्रमांक १ . मागिल सभा दिनांक २५.१०.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ - मा० उपाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागिल दिनांक २५.१०.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ - मागिल सभेत पारित झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ - मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा० सरव्यवस्थापक यांनी मागिल दिनांक २५.१०.२००० रोजी पारित झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत थोडक्यांत माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ - बँकेच्या माहे सप्टेंबर २००० मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ - मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या माहे सप्टेंबर २००० मध्ये झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

---

विषय क्रमांक ४ - बँकेच्या माहे २९ सप्टेंबर व ३० सप्टेंबर २०००चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल जिंदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ - मा० सभाध्यक्षा यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे २९ सप्टेंबर व ३० सप्टेंबर २०००चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल जिंदगीच्या परिस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५ - मा० सभाध्यक्षा यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ५(१) - बँकेचे मा० अध्यक्ष यांचे मुंबई येथिल सभेचे प्रवास भत्ता बिल मंजूर करणे.

ठराव क्रमांक ५(१) - जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकरिता मुंबई येथे कापूस सहभाग योजना

मुंबई येथील
संदर्भात आयोजीत केलेल्या सभेस बँकेचे मा. अध्यक्ष श्री. सुनील केदार उपस्थित राहिल्याबद्दल मुंबई येथील सभेचे प्रवास भत्ता बील रु. ७५४०/- मंजुरीकरिता बँकेस सादर केले आहे. मा. श्री. सुनील केदार, अध्यक्ष यांचे दिनांक ८.११.२००० रोजी झालेल्या मुंबई येथील सभेचे रुपये ७५४०/- प्रवास भत्ता बील मंजूर करण्यांत येत आहे.

सुचक - श्री. अ. रा. गुप्ता.
अनुमोदक श्री सं. ल. चोरे.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५(२) - एकाधिकार कापूस खरेदी योजना २०००-०१ हंगामातील कापूस खरेदीसाठी करावयाच्या कर्ज पुरवठ्यातील जिल्हा बँकांच्या सहभागाबाबत.

ठराव क्रमांक ५(२) - मा. सभाध्यक्षा यांनी सांगीतले की, एकाधिकार कापूस खरेदी योजना २०००-०१ हंगामातील कापूस खरेदीसाठी कापूस उत्पादक पणन महासंघाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे कर्ज मागणी केल्यानुसार आपल्या बँकेचा कापूस कर्ज सहभाग योजनेत सहभाग असावा यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या; मुंबई यांनी पत्र क्र. कृओमा/कापूस कर्ज सहभाग/फा. ५०६/३४४२/२०००-०१ दि. २.११.२००० पाठवून गतवर्षीप्रमाणे या योजनेत आपली बँक किती रक्कम गुंतविणार याबाबत बँकेचा निर्णय त्वरित कळविणेकरिता विचारणा केली आहे. कापूस कर्ज सहभाग योजनेअंतर्गत करावयाची गुंतवणूक साधारणतः जानेवारी २००१ ते आगस्ट २००१ या कालावधीकरिता राहणार असून या गुंतवणुकीवर १६.५% अथवा वेळोवेळी झालेल्या सुधारीत दराने व्याज मिळणार आहे. दिनांक १३.११.२००० चे आर्थिक स्थितीचा आढावा घेतला असतां आपले बँकेकडे सध्या रूपये ७५.०० कोटी सरप्लस निधी आहेत. यामुळे कापूस सहभाग योजनअंतर्गत रूपये ५०.०० कोटी (रूपये पन्नास कोटी) फक्त चा सहभाग असावा असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कापूस सहभाग योजने अंतर्गत रूपये ५०.०० कोटी गुंतवणुक करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. याकरिता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि कंसारशियम लिडर बँक म्हणून राज्य सहकारी

बँक ह्यांच्यांत करावयाच्या करारातील अटीस मान्यता देण्यांत येत आहे. या योजने अंतर्गत वेळोवेळी चर्चा करून निर्णय घेणे, दस्तऐवजावर सह्या करणे याकरिता बँकेचे सरव्यवस्थापक अथवा यांचे अनुपस्थितील बँकेचे प्रभारी व्यवस्थापक यांना अधिकार देण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने मा. सभाध्यक्षा यांनी सभेला उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक — उपाध्यक्षा तथा सभाध्यक्षा (Asha Mahurkar)

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल कोऑप. बँक लिमी., नागपूर.

बँकेच्या मा. व्यवस्थापक समितीची सभा शुक्रवार दिनांक २९.१२.२००० रोजी दुपारी १.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात" बँकेचे अध्यक्ष मा.श्री.सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा.श्री. अ.रा. गुप्ता | सदस्य |
| ४. | मा.श्री. सं.लि. चोरे | " |
| ५. | मा.श्री. वि.रा. हुलके | " |
| ६. | मा.श्री. ना.र. जम्भिकाटे | " |
| ७. | मा.श्री. र.व्यं. निमजे | " |
| ८. | मा.श्री. वि.वि. निमजे | " |
| ९. | मा.श्री. मु.श्रि. पन्नासे | " |
| १०. | मा.श्री. चं.तु. समर्थ | " |
| ११. | मा.श्री. एस.एस. गोडे | प्रभारी व्यवस्थापक. |

- अनुपस्थित -

१. मा.श्री. ब.भा. तायवाडे — सदस्य.
२. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
३. मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१, सह.संस्था (बँक), नागपूर.
४. मा. विभागीय अधिकारी, म.रा. सह. बँक मर्या. विभा.कार्यालय, नागपूर.
५. मा.श्री. एन.एन. चौधरी — सरव्यवस्थापक.

---

मा.श्री. ब.भा. तायवाडे, सदस्य हे सभेला अनुपस्थित आहेत. त्यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली. तसेच बँकेचे सरव्यवस्थापक श्री.एन.एन.चौधरी मिटींगकरिता पुणे येथे गेल्याने सभेला अनुपस्थित आहेत.

यानंतर सभेला उपस्थितांचे स्वागत करून विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस मा.अध्यक्ष यांनी सुरुवात केली.

विषय क्रमांक १ – मागील सभा दिनांक १४.११.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर

सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक १४.११.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ - मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने बँकेचे प्रभारी व्यवस्थापक यांनी मागील दिनांक १४.११.२००० रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत येऊक्यांत माहिती दिली. यावर मा० अध्यक्ष म्हणाले की, ठराव क्रमांक ५(७) बाबत दिलेली माहिती अपूर्ण आहे, तर ती माहिती मागील सभेत झालेल्या निर्णयाप्रमाणे एकाधिकार कापूस खरेदी योजना २०००-२००१ हंगामातील कापूस खरेदीसाठी कापूस कर्ज सहभाग योजनेअंतर्गत रुपये २०.०० कोटी गुंतवणुक करण्यांत आली आहे अशी पाहिजे. विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक १४.११.२००० रोजी झालेल्या सभेतील ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ - बँकेच्या माहे आक्टोंबर २००० मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे माहे आक्टोंबर २००० मध्ये झालेला खर्च सर्वानुमते मान्य करण्यांत आला.

---

विषय क्रमांक ४ - बँकेचे माहे आक्टोंबर २००० व नोव्हेंबर २०००चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे माहे आक्टोंबर २००० व नोव्हेंबर २०००चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरल जींदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक ५ - बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी आलेल्या सहकारी संस्थांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी सहकारी संस्थांनी आवश्यक

कागदपत्रासह बँकेकडे अर्ज सादर केले आहेत. प्राप्त झालेल्या अर्जानुसार बँकेचे बँकेचे तपासणी विभागामार्फत सदर संस्थांची तपासणी करण्यात आली असून ह्या संस्था कार्यरत असल्याचे आढळून आले आहे. व त्या संस्थांची ठेव खाती बँकेचे शाखांमध्ये सुरू आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे सभासदत्व मिळणेसाठी अर्ज — केलेल्या खालील संस्थांना बँकेचे सभासदत्व देण्याचे मान्य करण्यांत आले असून संबंधित सहकारी संस्थांना सभासदत्व फी व प्रवेश फी भरणेकरिता पत्र देऊन कळविण्यांत यावे, असे ठरले.

| अ.क्र. | सहकारी संस्थेचे नांव | र.न. | शाखा ठेवखाते. |
|---|---|---|---|
| १. | रवि कमर्शियल को-ऑप. बँक मर्या. मानेवाडा रोड, हनुमाननगर, नागपूर | ३७१/९९ | हनुमाननगर |
| २. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अर्बन को-ऑप. सोसा. लिमी. नागपूर, नविन मंगळवारी वा.नं.४५, मेंहदीबाग रोड, नागपूर | ५५४३ | गांधीबाग. |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६ – मा. अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ६(१) – रोड ट्रान्सपोर्ट योजनेअंतर्गत कर्जवाटप केलेल्या उद्योजकांकडील थकबाकी रकमेचे परतफेडीकरिता कायदेशिर कारवाई बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६(१) – मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या महाल शाखेतून रोड ट्रान्सपोर्ट योजनेअंतर्गत खालील ४ उद्योजकांना कर्जवाटप करण्यांत आले आहे.

| अ.क्र. | उद्योजकाचे नांव | कर्जकारण | कर्जवाटप तारीख | कर्जरक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १. | श्री ओंकार तेजराव पारवे | प्रवासी बस | २४.२.९५ | ९.३३ लाख |
| २. | श्री महेंद्र तेजराव पारवे | —,,— | १४.२.९५ | ९.४४ लाख |
| ३. | श्री जीतेंद्र अनिलकुमार तुमाने | —,,— | १४.२.९५ | ५.३३ लाख |
| ४. | श्री. विठ्ठल जनार्दन ढोके | —,,— | १४.२.९५ | ५.४४ लाख. |

वरील चारही उद्योजकांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड केली नाही. वेळोवेळी त्यांना भेटी देऊन कर्ज परतफेडीकरिता सुचना देण्यांत आल्या. परंतु त्यांनी कर्जाचा भरणा केलेला नाही. त्यामुळे नजरगहाणांत असलेली बँक कर्जावरील श्री. ओंकार तेजराव पारवे, श्री महेंद्र तेजराव पारवे यांचे

वाहने जप्त करण्यांत आली. श्री जितेंद्र अनिलकुमार तुमाने व श्री. विठ्ठल जनार्दन ढोके यांचे वाहने कोठे व कोणत्या स्थितीत आहे. याबाबत कांहीच पत्ता लागला नाही. जप्त करण्यांत आलेली श्री ओंकार तेजराव पारवे व श्री महेंद्र तेजराव पारवे यांची वाहने लिलावाद्वारे विकून आलेली रक्कम त्यांचे कर्ज खात्यात जमा करण्यांत आल्या नंतरही त्यांचेकडे कर्जबाकी शिल्लक राहते. त्यामुळे वरील चारही उद्योजकांविरुध्द व त्यांचे जमानतदारांविरुध्द कर्ज वसुलीसाठी मा. सहकारी न्यायालय, नागपूर येथे दावा दाखल करावा असे वाटते.

विषयावर चर्चा होऊन खाली दर्शविलेले चारही उद्योजक व त्यांचे जमानतदार यांचे विरुध्द कर्जवसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ९१ अंतर्गत मा. सहकारी न्यायालय, नागपूर येथे दावे दाखल करण्यासाठी मान्यता देण्यांत येत आहे.

| अ.क्र. उद्योजक | जमानतदार |
| --- | --- |
| १. श्री ओंकार तेजराव पारवे | १. श्री देवेंद्र अनिलकुमार तुमाने, नागपूर |
| | २. श्री अनिलकुमार पारलुजी तुमाने, नागपूर |
| २. श्री महेंद्र तेजराव पारवे | १. श्रीमती कस्तुरबा रामभाऊजी शेंडे, नागपूर. |
| नागपूर | २. श्री देवेंद्र अनिलकुमार तुमाने, नागपूर. |
| ३. श्री जितेंद्र अनिलकुमार तुमाने | १. श्री देवेंद्र अनिलकुमार तुमाने, नागपूर. |
| नागपूर | २. श्री जयसिंग गुलाबसिंग रोहीले, नागपूर. |
| ४. श्री विठ्ठल जनार्दन ढोके | १. सौ. आशाबाई अनिलकुमार तुमाने, नागपूर |
| काटोल. | २. श्री हरिश्चंद्र मदने, नागपूर. |

ठराव सर्वानुमते मंजूर

मा. अध्यक्ष यांचे परवानगीने झालेल्या चर्चेत मा. अध्यक्ष म्हणाले की, मुख्य कार्यालय स्तरावरील अकांऊंटींगची कामे डिसेंट्रलाईझ करण्याचे दृष्टीने तालुका स्तरावरील शाखेच्या ठिकाणी सेंट्रलाईज करण्यांत यावी. अकांऊंटींगची लहान लहान कामाकरिता जी तालुका स्तरावरच निपटत असतील त्याकरिता मुख्य कार्यालयास नागपूर येथे येण्याची आवश्यकता राहणार नाही. त्यामुळे प्रवास व दैनिक भत्यावर होणारा खर्च कमी होईल असे वाटते. यावर मा. श्री. पन्नासे, संचालक यांनी तालुका स्तरावरील शाखा व्यवस्थापकांना अधिकार प्रदान करावे लागतील असे मत मांडले. श्री. समर्थ, संचालक यांनी तालुक्याचे शाखांवर एक जादा व्यवस्थापक नेमण्यांत यावा व त्यांचेकडे त्या तालुक्यातील पूर्ण शाखांचे प्रशासन व इतर कामे सोपवून त्यांना अधिकार प्रदान करण्यांत

यावे अशी सुचना केली. मा.श्री.अ.रा.गुप्ता, संचालक यांनी ह्या कामाकरिता नजिकच्या ५-६ महिने एक वर्षाचे कालावधीत रिटायर्ड होणारे अधिकारी पाठवू नये अशी सुचना केली. अफरातफर करणारे कर्मचाऱ्यांना कुठलीही दया-माया न दाखविता त्यांचेवर कारवाई करण्यांत यावी. असे मा.श्री.पन्नासे संचालक यांनी पुन्हा सुचना केली. यावर मा. अध्यक्ष यांनी अफरातफर फ्रॉडचे सर्व प्रकरणांची सविस्तर माहिती दिनांक ३.९.२००९ रोजी होणाऱ्या मा. सेवक उपसमितीचे सभेत ठेवण्यांत यावी. तसेच बँकेचे मुख्य कार्यालयातील व शाखांमधील कर्मचाऱ्यांना एकाच टेबलवर दिर्घकाळ न ठेवता त्यांचे टेबल व काम एका विशिष्ट कालावधीनंतर बदलण्यांत यावे व याकरिता धोरण तयार करण्यांत यावे असे सांगितले.

यानंतर सभेसमोर कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

प्रभारी व्यवस्थापक | अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि. नागपूर.

मा॰ व्यवस्थापक समितीची सभा बुधवार दिनांक १७.१.२००१रोजी दुपारी ३.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात" बँकेचे अध्यक्ष मा.श्री सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला खालिल मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

१. मा.श्री. सुनील केदार. अध्यक्ष
२. मा.सौ. आशाताई महाजन उपाध्यक्षा
३. मा.श्री. अ.श. गुप्ता सदस्य
४. मा.श्री. सं.लि. चोरे ,,
५. मा.श्री. वि.रा. ढुलके ,,
६. मा.श्री. ना.र. अग्निकार्ट ,,
७. मा.श्री. वि.वि. निमजे ,,
८. मा.श्री. ब.भा. तायवाडे ,,
९. मा.श्री. मु.भि. पन्नासे ,,
१०. मा.श्री. वं.तु. समर्थ ,,
११. मा.श्री. ए.एन. चौधरी सरव्यवस्थापक

- अनुपस्थित -

१. मा.श्री. र.व्यं. निमजे सदस्य.
२. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
३. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (बँक), नागपूर.
४. मा. विभागीय अधिकारी, म.रा.सह.बँक मर्या. विभागीय कार्यालय, नागपूर.

---

मा.श्री.र.व्यं.निमजे सदस्य, हे सभेला अनुपस्थित आहेत त्यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यात आली. यानंतर सभेला उपस्थितांचे स्वागत करून विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस मा॰ अध्यक्ष यांनी सुरुवात केली.

---

विषय क्रमांक १ :- मागील सभा दिनांक २१.१२.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा॰अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन मागील सभा दिनांक २१.१२.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

विषय क्रमांक २ :– मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :– मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील सभा दिनांक २१.१२.२००० रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला थोडक्यात माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाही संदर्भात दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ :– बँकेच्या माहे नोव्हेंबर २००० मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ :– मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे नोव्हेंबर २००० मध्ये झालेल्या नोव्हेंबर २००० मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देण्यांत आली.

---

विषय क्रमांक ४ :– बँकेच्या २९ डिसेंबर २०००चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला औंदगीच्या परिस्थितीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ४ :– मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या २९ डिसेंबर २०००चे ताळेबंद पत्रकाची तसेच बँकेने राखलेल्या रोख निधी व तरला औंदगीच्या परिस्थितीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५ - मा. अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ५(१) - बँकेतील कर्मचाऱ्यांच्या पगारवाढी संबंधात माहिती देणे.

ठराव क्रमांक ५(१) - मा. वेज बोर्डाचे निवाड्यानुसार पगारवाढ लागू केल्यास बँकेवर पडणाऱ्या वार्षिक अतिरिक्त बोझाबाबत तसेच दिनांक १.४.२००० पासून पगारवाढ लागू केल्यानंतर प्रत्यक्षांत पडलेल्या वार्षिक अतिरिक्त बोझाबाबत सभेला माहिती देण्यांत आली. विषयावर चर्चा करतांना मा. अध्यक्ष म्हणाले की, बँक व्यवस्थापन आणि कर्मचारी ह्यांचेतील वातावरण सलोख्याचे व चांगले रहावे ही बाब विचारांत घेऊन मा. वेज बोर्डाचे निवाड्यानुसार कर्मचाऱ्यांना दिनांक १.५.२००० पासून पगारवाढ देणेबाबत निर्णय घेण्यात आला.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मा. वेज बोर्डाचे निवाड्यानुसार देण्यांत आलेल्या बँकेतील कर्मचाऱ्यांच्या पगारवाढी संबंधात देण्यांत आलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक ५(२) :- मुख्य कार्यालय स्तरावरील संकलनाचे काम तालुका स्तरावर संगणकाद्वारे विकेंद्रित करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५(२) - बँकेच्या सर्व शाखांकडून मुख्य कार्यालयास प्राप्त होणाऱ्या स्टेटमेंटचे संकलनाचे कामांत सुलभता आणणेकरिता व होणारा विलंब टाळता यावा यासाठी मुख्य कार्यालय स्तरावरील संकलनाचे काम तालुका स्तरावर संगणकाद्वारे विकेंद्रित करण्यांत यावे. त्यामुळे ८७ शाखांकडील संकलनाचे काम तालुका स्तरावर संगणकाद्वारे पूर्ण झाल्यानंतर मुख्य कार्यालय स्तरावर केवळ १३ तालुक्याचे संकलनाचे काम करावे लागेल. तसेच डाक घेवुन येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर होणारा प्रवास खर्च कमी होईल. याकरिता तालुका स्तरावरील शाखांमध्ये ज्यांचे सेवा निवृत्तीला १०-१२ वर्ष वेळ आहे असे कर्मचारी देण्यांत यावे अशी सुचना मा. श्री. तायवाडे, संचालकांनी केली.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन मुख्य कार्यालय स्तरावरील संकलनाचे काम तालुका स्तरावर संगणकाद्वारे विकेंद्रित करण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(सही) सरव्यवस्थापक  (सही) अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लिमी. नागपूर.